# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ / फाल्गुन २९, १९४६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल मंत्री** | |
| **(२)** | **वने मंत्री** | |
| **(३)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(४)** | **कृषी मंत्री** | |
| **(५)** | **सामाजिक न्याय मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(६)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(७)** | **मदत व पुनर्वसन मंत्री** | |
| **(८)** | **मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४९**

---

### जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील डोंगराळ व ग्रामीण भागातील रस्ते सुधारण्याबाबत

**(१) * २२१ श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील डोंगराळ व अतिदुर्गम भागात तसेच गुजरात, दादरा-नगर हवेली व राज्याच्या सीमेलगत असलेल्या दाभेरी, बोपदरी, डाहूळ, सागपाणी, पासबुड या गावांमध्ये रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त भागाची रचना सागरी, नागरी व डोंगरी अशी असून दाभेरी-सागपाणी दरम्यानच्या रस्त्यात ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्यामुळे तेथील नागरिकांची गैरसोय होत असून अपघातांचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील अनेक गावांमधील रस्ते खराब असल्यामुळे त्या मार्गावरील एस.टी. बस सेवा देखील बंद करण्यात आल्याने आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळा व कॉलेजमध्ये जाण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त भागातील रस्ते सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) सदर गावांना जोडणारे रस्ते काही ठिकाणी क्षतीग्रस्त झाले आहेत, हे खरे आहे.
(२) अपघातांचे प्रमाण वाढल्याची नोंद नाही.

(३) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बससेवा दाभेरी ते डाहोळ या मार्गावर सुरु आहे. तथापि, काही अन्य मार्गावर बससेवा सद्य:स्थितीत बंद आहे. सदर लांबीमध्ये देखभाल व दुरुस्तीची कामे हाती घेऊन बससेवा पूर्ववत करण्यात येत आहे. तथापि, सदर रस्त्यावर अन्य वाहनांची वाहतूक सुरु आहे.
(४) दाभेरी-बोपदरी या राज्य मार्गावर २.९ कि.मी. लांबीत रस्ता सुधारणा करण्याच्या कामास रु.२९१.०० लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करुन, कार्यारंभ आदेश दिनांक ७/१०/२०२४ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. सदरची कामे माहे मे, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर रस्त्याच्या उर्वरित लांबीत देखभाल व दुरुस्तीची कामे करुन रस्ता वाहतूकीकरिता सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

दाभेरी-डाहूळ-सागपाणी या प्रजिमा दर्जाच्या रस्त्यावर २.२ कि.मी. लांबीत रस्ता सुधारणा करण्याच्या कामास रु.२४८.८६ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करुन, कार्यारंभ आदेश दिनांक ११/१०/२०२४ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. सदरची कामे माहे मे, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. रस्त्याची उर्वरित लांबी सुस्थितीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील कनकापूर खर्डे (ता. देवळा) व वडनेर भैरव (ता.चांदवड) येथील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२) * ५९७७ डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात द्राक्षाचे उत्पादन होत असून येथील द्राक्षाची निर्यात परदेशात देखील होत असताना वातावरणीय बदलामुळे द्राक्ष पिकांचे नुकसान होत असून निर्यातक्षम द्राक्ष उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाजगाव कनकापूर खर्डे (ता.देवळा) व वडनेर भैरव (ता.चांदवड) येथील द्राक्ष मण्यांना तडे गेल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वारंवार होणाऱ्या वातावरणीय बदलामुळे गत अनेक वर्षांपासून द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्तांचे तात्काळ पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

दिनांक २८.१२.२०२४ रोजी चांदवड तालुक्यात अवेळी पाऊस झाल्याने १० गावांमध्ये द्राक्ष मण्यांना तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, देवळा तालुक्यात द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांकडून तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.
(३) होय, हे खरे आहे.

(४) चांदवड तालुक्यात २८५ शेतकऱ्यांचे १६८.९० हेक्टर क्षेत्र ३३ टक्केपेक्षा जास्त बाधित आहे. नाशिक जिल्ह्यात अवेळी पावसामुळे झालेले फळपिक नुकसानीचे पंचनामे करुन ३३ टक्के वर द्राक्ष फळपिक नुकसान झालेल्या माहे ऑक्टोबर, २०२४ मधील ४१८३.४२ हेक्टर व माहे डिसेंबर, २०२४ मधील २६५.७१ हेक्टर क्षेत्राचे पंचनामे कृषि विभागाकडे प्राप्त झाले असून निधी वितरणासाठी महसूल विभागाकडे पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रावेर-यावल (जि.जळगांव) परिसरात केळी उत्पादक शेतकऱ्यांना पिकांवरील रोग निर्मुलनासाठी देण्यात येणारे पॅकेज पुन्हा सुरु करण्याबाबत

**(३) * ५६२४ श्री.अमोल जावळे (रावेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर-यावल (जि.जळगांव) परिसरात हवामानातील आर्द्रता व अतिथंडीमुळे बहुतांश केळी (पिल बाग) पिक व नवती (नवीन पालवी) यावर बुरशीजन्य सिगाटोका करपा या रोगाचा प्रार्दुभाव झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर केळी पिकांवर अनेक रोगांचा प्रार्दुभाव होऊन शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना औषधे उपलब्ध करुन देण्यासाठी करपा रोग निर्मुलन पॅकेजअंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ९५ कोटी निधीपैकी ३५ कोटी खर्च झाले असून सद्य:स्थितीत सदर पॅकेज बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त रोगांचा प्रार्दुभाव रोखणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे व करपा रोग निर्मुलनासाठी असलेले पॅकेज पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) व (२) रावेर (जि.जळगांव) परिसरात केळी पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव झाल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.
(३) हे खरे आहे.

केळीवरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी सन २०१२-१३ पासून सन २०१६-१७ पर्यंत केळी करपा निर्मुलन कार्यक्रम राबविण्यात येत होता. सदर योजनेच्या माध्यमातून केळीवरील करपा नियंत्रणासाठी शेतकऱ्यांमध्ये प्रचार व प्रसिध्दी करणे, केळी उत्पादक शेतकऱ्यांना अनुदानित तत्त्वावर बुरशीनाशके उपलब्ध करुन देण्यात येत होते. तथापि, सन २०१७-१८ पासून सदरची योजना बंद करण्यात आलेली आहे.
(४) जळगांव जिल्ह्यात फलोत्पादन पिकावरील किड रोग सर्व्हेक्षण, सल्ला व व्यवस्थापन (हॉर्टसॅप) सन २०२४-२५ या योजनेंतर्गत केळी या फळपिकाचे सर्व्हेक्षण सुरु आहे. या सर्व्हेक्षणामध्ये केळीवरील फुलकिडे, करपा (सिगाटोका) या कीडरोगांचे सर्व्हेक्षण केले जाते. योजनेंतर्गत ३४ शेतीशाळा राबविण्यात येत आहेत.

हॉर्टसॅप योजनेंतर्गत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला व केळी संशोधन केंद्र, जळगांव या संस्थांमार्फत शेतकऱ्यांना कृषि सल्ला देण्यात येतो. तसेच, आजअखेर शेतकऱ्यांना ५,८९५ कृषि सल्ले देण्यात आले आहेत.

यावल, जि.जळगांव येथे करपा रोगाचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर आढळून आलेला नाही.

जळगांव जिल्ह्यात माहे जानेवारी ते डिसेंबर, २०२४ या कालावधीत विविध नैसर्गिक आपत्तीमुळे एकूण २,०४,१०९ शेतकऱ्यांचे शेती/ फळपिकाखालील १,४३,११६ हेक्टर क्षेत्र बाधित झालेले आहे. या बाधित क्षेत्राकरिता रु.१०३.४७ कोटी इतका निधी नैसर्गिक आपत्ती अन्वये वितरित करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे पानबारा, खानापूर, मोरकरंजा व जामनपाडा (ता.नवापूर, जि.नंदुरबार) येथे मनरेगा योजनेंतर्गत झालेल्या निकृष्ट कामांबाबत**

**(४) * १७०८ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पानबारा, खानापूर, मोरकरंजा व जामनपाडा (ता.नवापूर, जि.नंदुरबार) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगारी हमी योजनेंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम सार्वजनिक बांधकाम उपविभागांतर्गत भगवती इंटरप्राईजेस (नवापूर) या एजन्सीव्दारे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त एजन्सीद्वारे गावांमध्ये पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम, खोदकाम, रुबल सोलिन न करता व निकृष्ट दर्जाचे असून तसेच या कामासाठी राबविण्यात आलेली निविदा प्रक्रियाही या योजनेच्या निकषानुसार राबविलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गावांमधील पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाची चौकशी पूर्ण न करताच कंत्राटदाराची देयके अदा करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे महानगरपालिकेतील भुयारी गटार योजनेचे ठेकेदार यांनी मातीची बेकायदेशीर वाहतूक करून स्वामित्वधन (रॉयल्टी) बुडविल्याबाबत**

**(५) * ९६९ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील भुयारी गटार योजनेसाठी नेमलेले कंत्राटदार आनंद कंस्ट्रवेल यांनी मातीचे उत्खनन करुन पुन्हा भरणी केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या मातीची रॉयल्टी न भरता अथवा परवानगी न घेता मातीची बेकायदेशीर वाहतूक केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठेकेदाराने सुमारे ४,६५२ ब्रास मातीच्या वाहतूकीपोटी ४ कोटी ८३ लाख ८० हजार ८०० रुपये स्वामित्वधन (रॉयल्टी) बुडविल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, ठाणे महानगरपालिका हद्दीतील मौजे कोपरीगाव तालुका गट क्र.८६ मध्ये ठेकेदार मे.एन.सी.सी. व एस.एम.सी. यांनी बांधकाम करण्यासाठी हजारो ब्रास मातीचा भराव केला असून त्याचे स्वामित्वधन (रॉयल्टी) बुडविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषी कंत्राटदार व दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) ठाणे महानगरपालिकेकडून केंद्र व राज्य शासनाच्या अर्थिक सहकार्यातून जेएनएनयुआरएम अंतर्गत भुयारी गटाचे योजनेचे काम संबंधित ठेकेदार यांना देण्यात आले. सदर कामातुन वाहतूक केलेल्या व विल्हेवाट लावलेल्या माती/डेब्रीजच्या ४६५२ ब्रास परिमाणचे स्वामित्वधन संबधित ठेकेदार यांनी शासन जमा केले आहे.

मौजे कोपरी ग.नं.८६ मध्ये एन.सी.सी. व एस.एम.सी.(सेंटीज) जे. व्ही. कंपनीतर्फे उत्खनन होत असल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या चौकशीत सदर कंपनीने मौजे कोपरी ग.नं.८६ मध्ये १९,०८९ ब्रास मातीचा भराव केल्याचे आढळून आले व सदर कंपनीकडे उत्खननाबाबत कुठल्याही प्रकारचे आदेश अथवा परवानगी असल्याचे दिसून आलेली नाही. त्यानुषंगाने, संबंधित कंपनीविरूध्द महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४८ (७) अन्वये कार्यवाही करण्यासाठी वेळोवेळी सुनावणी घेण्यात येवून दिनांक ०४.०३.२०२५ रोजी अंतीम सुनावणी घेण्यात येवून प्रकरण निर्णयासाठी बंद करण्यात आले आहे.
(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणातील आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना मच्छिमारांप्रमाणे रॉकेल व डिझेल परतावा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६) * ३०९ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.महेश सावंत (माहिम) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकण पट्ट्यातील विशेषत: सिंधुदूर्ग जिल्ह्यातील आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने मच्छिमारांप्रमाणे रॉकेल व डिझेल परतावा देण्याची मागणी मा.पालकमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना लाखो रुपयांचे रॉकेल व डिझेल वापरुन झाडांवर फवारणी करणे, मजुरी व औषधांच्या किंमतीत खूप वाढ होणे तसेच प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेकडून मिळणारी रक्कम माहे जानेवारी, २०१२ पासून बंद असल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांच्या मागणीनुसार आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना रॉकेल व डिझेल परतावा देण्याबाबत तसेच प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेंतर्गत मिळणारी रक्कम शेतकऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

फवारणी करणे, मजुरी व औषधांच्या किंमतीत खूप वाढ होणे ही बाब खरी आहे. परंतु प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेकडून मिळणारी रक्कम माहे जानेवारी, २०१२ पासून बंद आहे ही बाब खरी नाही.
(३) शेतकऱ्यांच्या मागणीनुसार आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना रॉकेल व डिझेल परतावा देण्याकरीता शासनाकडे कोणतीही योजना अस्तित्वात नाही. तसेच प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेंतर्गत मिळणारी रक्कम शेतकऱ्यांना देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मार्कंडपिंप्री (ता.कळवण, जि.नाशिक) येथील ई-निविदेमध्ये झालेली अनियमितता**

**(७) * ५६३३ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मार्कंडपिंप्री (ता.कळवण, जि.नाशिक) येथील राज्य योजना निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास (२४०६-२२९५) अंतर्गत मंजुर कामांची ई-निविदा काढताना सूचना क्रमांक ७ मध्ये अनियमितता झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ई-निविदा प्रक्रियेत उप वनसंरक्षक, पूर्व विभाग (नाशिक) यांनी एकाच प्रकारच्या कामांचे भाग करुन सदरची कामे हेतुपुरस्सर मजुर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंते यांना देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वीही उप वनसंरक्षक यांनी सप्तश्रृंगी गड विकास आराखड्यातील वन जमिनीवरील कामांमध्ये अनियमितता केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अपर मुख्य सचिव (वने), मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री (वित्त), मा.नियोजन मंत्री व मा.वने मंत्री महोदयांना लेखी निवेदन देवून सदरची ई-निविदा रद्द करुन नवीन एकच ई-निविदा काढण्याची मागणी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत तसेच यातील दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) व (२) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास (२४०६-२२९५) अंतर्गत शासन निर्णय दिनांक १४.१०.२०२४ अन्वये मार्कंडपिंप्री (ता.कळवण, जि.नाशिक) येथील विकास कामांकरीता रु.४२७.९० लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे. सदर मार्कंडपिंप्री (ता.कळवण, जि.नाशिक) येथील निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास या योजनेंतर्गत करावयाच्या कामांची ई-निविदा सूचना क्रमांक ०७/२०२४-२५, दिनांक १३.०१.२०२५ रोजी ऑनलाईन संकेतस्थळावर प्रचलित शासन नियमातील तरतुदीनुसार प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर ई-निविदा ही एकसारख्या कामाचे एकत्रिकरण करुन प्रसिध्द करण्यात आली. तसेच सदर ई-निविदेच्या कामांची मजुर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व खुला कंत्राटदार यांचेमध्ये ३३:३३:३४ या प्रमाणात विभागणी करुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता/मजूर सहकारी संस्था व खुल्या कंत्राटदार यांचेकडून ई-निविदा सूचना क्रमांक ०७/२०२४-२५ अन्वये ऑनलाईन प्रणालीद्वारे १४ ई-निविदा काढण्यात आल्या होत्या.

तसेच सदर ई-निविदा सूचना क्रमांक ०७/२०२४-२५ मधील १० कामांना विहित मुदतीत दोन मुदतवाढ देऊनही एकही कंत्राटदार यांनी ई-निविदा प्रक्रियेत भाग घेतला नाही. तसेच श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार, वि.स.स. कळवण यांनी सदर ई-निविदा रद्द करुन एकच ई-निविदा प्रसिध्द करावी अशी मागणी केल्याने दिनांक १३.०१.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली ई-निविदा दिनांक १३.२.२०२५ रोजी रद्द करण्यात आली.

तद्नंतर सदर कामांची सुधारित एकत्रित एकच ई-निविदा दिनांक २०.०२.२०२५ रोजी ऑनलाईन संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार, वि.स.स. कळवण यांचे दिनांक ११.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सप्तशृंगी गड विकास आराखड्यातील कामांच्या काढण्यात आलेल्या निविदांना स्थगिती देऊन नवीन एकत्रित निविदा काढणेबाबत उपवनसंरक्षक, पूर्व विभाग, नाशिक यांचे कार्यालयास विनंती केली होती. त्यानुषंगाने उपवनसंरक्षक, पूर्व विभाग नाशिक यांचे कार्यालयाच्या दिनांक २१.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये त्यांना सदर प्रकरणाचा सविस्तर अहवाल कळविण्यात आला आहे. तद्रुषंगाने श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार, वि.स.स. कळवण यांनी दिनांक २२.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये त्यांचे शंका निरसन झाल्याचे संबंधित कार्यालयास कळविले आहे. तसेच सदर पत्रात त्यांनी सदर कामाची ई-निविदा प्रक्रिया नियमानुसार केली असल्याचे नमूद केले आहे.

(४), (५) व (६) श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार, वि.स.स. कळवण यांचे मार्कंडपिंप्री (ता.कळवण, जि.नाशिक) येथील राज्य योजना निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास (२४०६-२२९५) अंतर्गत मंजूर कामांची ई-निविदा रद्द करुन नविन एकच ई-निविदा काढण्याबाबतचे दिनांक १७.१.२०२५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे. सदर निवेदनातील उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयाकडून उपरोक्त उत्तरातील (१) व (२) मध्ये नमूद केल्यानुसार निविदा रद्द करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

-----------------

## हिंगोली, नागपूर व नांदेड या जिल्ह्यातील रमाई घरकुल आवास योजनेंतर्गत आवश्यक निधी मिळण्याबाबत

**(८) * १४१६ श्री.संतोष बांगर (कळमनुरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) नगरपालिका अंतर्गत सन २०२० ते २०२४ या कालावधीपर्यंत रमाई घरकुल आवास योजनेंतर्गत २३ घरकुलांना ५७ लाख ५० हजार रुपयांचा निधी मंजूर झालेला असतानाही लाभार्थ्यांना पुरेसा निधी न मिळाल्यामुळे घरकुलांची कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच नागपूर मनपा क्षेत्रातील अनुसूचीत जातीतील काही लाभार्थ्यांना रमाई आवास योजनेतील २,५३२ घरकुलांचा पहिला हप्ता मिळाला असून मागील ९ महिन्यांपासून या योजनेचा दुसरा हप्ता मिळाला नसल्याने या घरकुलांची कामे प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच लोहा नगरपालिका प्रशासनाने (जि.नांदेड) येथील रमाई आवास योजनेंतर्गत एकही घरकुल मंजूर केलेले नसून अन्य आवास योजनांतर्गत मंजूर घरकुलांना अनुदानाचे वाटपही झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रमाई घरकुल आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करणे, त्यासाठी आवश्यक निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे अंशत: खरे आहे.

कळमनुरी (जि.हिंगोली) नगरपालिका अंतर्गत सन २०२० ते २०२४ या कालावधीपर्यंत रमाई घरकुल आवास योजनेंतर्गत २३ घरकुलांना मंजूर करण्यात आलेल्या ५७ लाख ५० हजार पैकी रु.४८ लाख इतका निधी माहे जानेवारी, २०२५ पर्यंत नगर परिषद, कळमनुरी यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे. तसेच, उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद, कळमनुरी यांनी जिल्हा सहायक आयुक्त, (नपाप्र) जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांचेकडे मागणी केली आहे.

(२) हे खरे नाही.

नागपूर मनपा क्षेत्रांतर्गत सन २०१०-११ पासून माहे फेब्रुवारी, २०२५ पर्यंत एकूण ५२७७ लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहे. त्यापैकी ५२६२ लाभार्थ्यांना प्रथम हप्ता, ४२६८ लाभार्थ्यांना द्वितीय हप्ता व ३२९१ लाभार्थ्यांना तृतीय हप्ता अदा करण्यात आला आहे. तसेच, सध्या महानगरपालिका स्तरावर प्रथम हप्ता-१५ लाभार्थी, द्वितीय हप्ता-९२६ लाभार्थी व तृतीय हप्ता-९२० लाभार्थ्यांचे प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे. सदर निधी लाभार्थ्यांच्या घरकुलांची प्रत्यक्ष मोक्का चौकशी केल्यानंतर अदा करण्यात येईल.

(३) हे अंशत: खरे आहे.

सन २०१६ नंतर रमाई आवास योजनेंतर्गत नगर परिषद, लोहा या कार्यालयाकडे कुठल्याही लाभार्थ्यांद्वारे घरकुलाकरीता अर्ज प्राप्त झालेला नाही.

तसेच, नगर परिषद, लोहा कार्यालयामार्फत इतर आवास योजना जसे की, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना शासन निर्णयातील तरतुदीनुसार बांधकामाच्या स्तरानुसार निधी वितरित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अनेक जिल्ह्यात नापिकीमुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना वाढीव मदत मिळण्याबाबत

**(९) * १५ श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यात विविध कारणास्तव शेतकऱ्यांच्या आत्महत्येमध्ये लक्षणीय वाढ होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नैसर्गिक आपत्ती, शेती पिकांना हमीभाव न मिळणे, नापिकी, विविध कर्ज, पिकांवरील रोग अशा विविध कारणांमुळे मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत असतानाही त्यांना अद्यापही नियमानुसार आर्थिक मदत देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनामार्फत वन्य प्राण्याच्या हल्ल्यात मृत व्यक्तीला देण्यात येणाऱ्या रुपये २५ लक्ष इतकी आर्थिक मदतीच्या धर्तीवर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत विविध स्तरावरुन व

लोकप्रतिनिधींकडून करण्यात आलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखणे, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणे, शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) व (२) अशंत: खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर, अमरावती विभागात इतर विभागापेक्षा शेतकरी आत्महत्या प्रकरणांची नोंद जास्त प्रमाणात आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रकरणी मदत देण्याबाबत निकष निश्चित केले आहेत. १) नापिकी, २) राष्ट्रीयकृत बँक/सहकारी बँक किंवा मान्यताप्राप्त सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करु न शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व ३) कर्जपरतफेडीचा तगादा या तीन कारणामुळे आत्महत्या घडली असल्यास मृत शेतकऱ्यांच्या वारसाच्या नावे जमा करण्यात येते. वरील निकषाच्या आधारे पात्र कुटुंबांना लवकरात लवकर मदत दिली जाते.
(३) महसुल व वन विभाग शासन निर्णय दिनांक २३.०१.२००६ अन्वये शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रकरणी रु. १ लक्ष इतकी मदत देण्यात येत आहे. वाढीव मदत देण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन नाही.
(४) व (५) आत्महत्या रोखण्यासाठी शासन स्तरावरून खालीलप्रमाणे विविध विभागामार्फत उपाययोजना करण्यात येतात.

- नैसर्गीक आपत्तीमुळे पिक नुकसान झाल्यास, मदत व पुनर्वसन कडून पीक नुकसानीबाबत मदत देण्यात येते.
- कृषी विभागामार्फत शासन परिपत्रक दिनांक ०४.०२.२०१९ अन्वये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत रु.६,०००/- आणि शासन निर्णय दिनांक १५.०६.२०२३ अन्वये नमो शेतकरी महासन्मान निधीअंतर्गत रु.६,०००/- असे एकूण रु.१२,०००/- वार्षिक अनुदान देण्यात येत आहे.
- शेतकऱ्यांच्या शेत मालाला योग्य भाव मिळणे, सिंचन सोई मध्ये वाढ करणे व समुदपदेशन केंद्रे संचलित करणे इ. योजना जिल्हा स्तरावर राबविण्यात येत आहेत.
- शासन निर्णय दिनांक २४.०७.२०१५ अन्वये विविध विभागामार्फत त्या त्या विभागांकडून उपाययोजना राबविण्यात येतात.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना निधी देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्याबाबत सर्व विभागीय आयुक्तांना सूचना दिलेल्या आहेत.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यात रोगांच्या प्रादुर्भावामुळे डाळिंब पिकांचे नुकसान होत असल्याबाबत

**(१०)* ५१४२ श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्याची डाळिंबाचा जिल्हा म्हणून एक विशेष ओळख असून या पिकांवर रोगाच्या प्रादुर्भावाचे प्रमाण वाढल्याने डाळिंब पिकांचे नुकसान होत असल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त संकटांमुळे डाळींब बागांचे नुकसान होत असून या रोगांस आळा बसण्याच्या दृष्टीने डाळिंब संशोधन केंद्राच्या माध्यमातून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.
(२) सोलापूर जिल्ह्यात डाळींब फळपिकाखालील एकूण २७,३१५ हेक्टर इतके क्षेत्र आहे. हॉर्टसॅप योजनेंतर्गत कृषि विभागातील क्षेत्रीय कर्मचारी व अधिकारी यांच्यामार्फत डाळिंबावरील तेलकट डाग, मर, फळे पोखरणारी अळी, खोड भुंगे व फुलकिडे या कीड व रोगांचे सर्व्हेक्षण केले जाते.

सोलापूर जिल्ह्यात कीड रोगांचा प्रादुर्भाव होऊन नुकसान झाले असल्याची बाब सर्व्हेक्षणामध्ये दिसून आली नाही.

तथापि, याबाबत व्हॉटसॅप ग्रुप्स, वेबसाईट व क्षेत्रभेटी दरम्यान सल्ला व मार्गदर्शक सूचना कृषि विभागाकडून तसेच, डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर यांच्याकडून प्रसारित करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**राज्यात ‘मागेल त्याला शेततळे’ या योजनेसाठी अनुदान मिळण्याबाबत**

**(११) * ४४५ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी शासनाने सन २०१६ मध्ये ‘मागेल त्याला शेततळे’ ही योजना सुरु केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, “मागेल त्याला शेततळे” या योजनेंतर्गत सुमारे २०४६ शेतकऱ्यांचे अर्ज प्रलंबित असून योजनेसाठी निधी अप्राप्त असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज करुन काही महिने उलटूनही अद्यापपर्यंत शेततळ्याची सोडत काढली नसल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित अर्ज निकाली काढणे, सोडत प्रक्रिया सत्वर राबविणे, योजनेकरिता निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) होय, हे खरे आहे. सन २०१६ पासून “मागेल त्याला शेततळे” ही योजना नियोजन (रो.ह.यो.) विभागामार्फत राबविण्यात येत होती.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

“मागेल त्याला शेततळे” या योजनेंतर्गत शेततळे व बोडीचे अर्ज दिनांक ०१.०२.२०२० पासून ऑनलाईन स्विकारणे बंद करण्यात आले आहे. सदर योजनेंतर्गत १४९५७९ शेततळी पूर्ण झालेली असून, लाभार्थ्यांना रु.७०६.६३ कोटी इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे.

कृषि विभागाच्या दिनांक २९.०६.२०२२ च्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेमध्ये शेततळे या बाबीचा समावेश करण्यात आला आहे. सन २०२२-२३ ते २०२४-२५ मध्ये आतापर्यंत रु.१२८.६९५ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. महाडीबीटी प्रणाली अंतर्गत ऑनलाईन पद्धतीने

शेतकऱ्यांकडून एकूण २६७२८० अर्ज प्राप्त झाले असून सोडतीद्वारे २१४९४३ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. त्यापैकी १८९३३६ अर्ज सोडतीनंतर विविध कारणास्तव रद्द झाले आहेत. उर्वरित २५६०७ अर्ज प्रक्रीयेत असून त्यापैकी ३२८६ अर्ज विविध स्तरावर कार्यवाहीत आहेत. २२३२१ अर्जांना संमती देण्यात आली असून, त्यातील २८५७ अर्ज प्रलंबित आहेत. १९४६४ शेततळे पूर्ण झाले आहेत. त्यापैकी १७९४६ शेततळ्यांकरिता रु.१२३.३९ कोटी अनुदान अदायगी लाभार्थ्यांना करण्यात आली आहे. १५१८ शेततळी विविध स्तरावर अनुदान अदायगी प्रक्रियेत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोस्टल रेग्युलेशन झोन (सीआरझेड) आणि नो डेव्हलपमेंट झोन (एनडीझेड) जमिनीच्या नोंदीमध्ये फेरफार करुन झालेला गैरव्यवहार

**(१२) * २५ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोस्टल रेग्युलेशन झोन (सीआरझेड) नो-डेव्हलपमेंट झोन मधील जमिनींना विकसित करण्यायोग्य बनविण्यासाठी मुंबई उपनगरातील अनेक मालमत्तांच्या नोंदीमध्ये मोठ्या प्रमाणात फेरफार करुन गैरव्यवहार करण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालाड (मुंबई) येथील एरंगळ, मढ आयलंड, वर्सोवा आणि इतर पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील ठिकाणांवर सरकारी नोंदी बदलून सुमारे १०२ नकाशे जोडून सीआरझेड, ना-बांधकाम क्षेत्र, सीमा समुद्र इत्यादीमध्ये मोठ्या प्रमाणात बदल करुन कंत्राटदार, एजंट व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोट्यवधीचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी उपअधिक्षक, भूमी अभिलेख, मुंबई उपनगर कार्यालयाने गोरेगाव आणि खेरवाडी पोलीस ठाण्यात दिनांक ६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास गुन्हे दाखल करुन चौघांना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) उप अधिक्षक भूमी अभिलेख, मुंबई उपनगर या कार्यालयांतर्गत मुंबई उपनगर जिल्ह्यातील एकूण ८८४ हद्द कायम मोजणी नकाशांपैकी १०२ नकाशांचे बनावटीकरण केल्याचे तसेच नगर भूमापन अधिकारी, गोरेगांव कार्यालयातील मौजे मालवण, मौजे पोईसर व मौजे एरंगळ या गावातील ८ मूळ आलेखात छेडछाड केल्याचे सन २०२० मध्ये निदर्शनास आले. त्याबाबत चौकशी करण्यासाठी जमाबंदी आयुक्त

व संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने दिनांक २२/०४/२०२२ रोजी सादर केलेल्या अहवालात १६५ नकाशे व ९ मूळ आलेखात छेडछाड केल्याचे नमूद केले आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी गोरेगांव पोलिस ठाणे येथे गु.र.क्र.८२/२०२०, गु.र.क्र.९७/२०२१, गु.र.क्र.९८/२०२१ व खेरवाडी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.४९०/२०२१ असे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल क्रिमिनल रिट याचिका क्र.१३५५२/२०२४ मधील सुनावणीदरम्यान मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २३/१०/२०२४ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई यांचे अध्यक्षतेखाली विशेष तपासणी पथक (SIT) नेमण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन गोरेगांव पोलिस ठाणे येथे दाखल गु.र.क्र.८२/२०२०, गु.र.क्र.९७/२०२१, गु.र.क्र.९८/२०२१ व खेरवाडी पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.क्र.४९०/२१ या चारही गुन्ह्यांचा तपास विशेष तपासणी पथकाकडे वर्ग करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांच्या तपासात आतापर्यंत २ सेवानिवृत्त शिपाई व ७ खाजगी व्यक्ती अशा एकूण ९ जणांना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

तसेच सदर बनावट नकाशांच्या चौकशी प्रकरणी जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने सादर केलेला अहवाल स्विकारुन बनावट नकाशांप्रकरणी जबाबदार असलेल्या भूमी अभिलेख विभागातील २ अधिकाऱ्यांविरुध्द तसेच १९ कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

तसेच चौकशी समितीने त्यांच्या अहवालामध्ये नमूद अनधिकृत बांधकामांबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत नगरविकास विभागामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक १२.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील महाविद्यालयामधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना आर्थिक वर्षातील शिष्यवृत्ती मिळण्याबाबत

**(१३) * ३०१३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील बहुतांश महाविद्यालयामधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सन २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील शिष्यवृत्ती अद्यापपर्यंत न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील विविध महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे अर्ज रायगड जिल्हा समाज कल्याण विभागाकडे पोहचले नसल्यामुळे सदर विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्ती तातडीने अदा करण्याबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

(३) सन २०२३-२४ मधील पात्र ३८६० विद्यार्थ्यांपैकी ३६८६ विद्यार्थ्यांना व सन २०२४-२५ मध्ये पात्र ३४४८ पैकी २६३९ विद्यार्थ्यांना राज्य शासनामार्फत राज्यहिश्याचा ४० टक्के निधी वितरित करण्यात आला आहे. उर्वरित

बहुतांशी अर्ज महाविद्यालयाच्या स्तरावर प्रलंबित असून सदर अर्ज तातडीने निकाली काढण्याच्या सूचना महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. तसेच केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांना देय होणारा ६० टक्के हिस्सा देखील केंद्र शासनामार्फत विद्यार्थ्यांच्या बँकखात्यामध्ये परस्पर अदा करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना व महाविद्यालयांना उद्भवणाऱ्या अडचणींबाबत राज्य शासनामार्फत वेळोवेळी उपाययोजना करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील व विशेषतः मुंढेगाव (ता.इगतपूरी, जि.नाशिक) येथील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे जेवण निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(१४) * १०६८ श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी आश्रमशाळांमधून देण्यात येणारा आहार निकृष्ट दर्जाचा असल्यामुळे आदिवासी विकास विभागाने आजूबाजूच्या एकलव्य निवासी शाळा व शासकीय आश्रमशाळेतील हजारो विद्यार्थ्यांना सेंट्रल किचनच्या माध्यमातून पोषण आहार पुरविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंढेगाव (ता.इगतपूरी, जि.नाशिक) येथे ४४ आश्रमशाळांमधील १८००० विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल किचनच्या माध्यमातून पुरविण्यात येणारा आहार हा अत्यंत निकृष्ट दर्जाचा व खाण्यास अयोग्य असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू सेंट्रल किचन हे पूर्णत: अस्वच्छ असून तेथे सडका भाजीपाला, किडलेले कडधान्य, अशुध्द पाणी पुरवठा तसेच मोठ्या प्रमाणात उंदिरांचा वावर असल्याचे लोकप्रतिनिधींनी टाकलेल्या धाडीत निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर सेंट्रल किचनबाबत अनेक नागरिक तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनेक तक्रारी करुनही विभागाच्या अधिकाऱ्यांकडे याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन विद्यार्थ्यांना उत्कृष्ट जेवण मिळण्याच्या दृष्टीने तसेच शासनाच्या नियमांचे पालन न करणाऱ्या संबंधित कंत्राटदारांवर व अधिकारी यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील श्रावणबाळ आणि संजय गांधी निराधार योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानातील गैरव्यवहाराबाबत

**(१५) * २२३५ श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात श्रावणबाळ आणि संजय गांधी निराधार योजनेंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिवती तालुक्यात योजनेतील मृत लाभार्थ्यांना जिवंत दाखवून दोन तत्कालीन तहसीलदारांनी या अनुदानाच्या रकमेचा अपहार केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तहसील कार्यालयातील संबंधित लिपिकाच्या मुलीच्या खात्यावर १० लाख ४६ हजार रुपये रक्कम जमा केल्याचे व संगणक परिचालकाच्या खात्यावर ३३ लाखाची रक्कम वळविल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपहारीत रक्कम वसूल करण्यासह संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी उपविभागीय अधिकारी, राजूरा यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी पथक नेमले होते. सदर पथकाच्या चौकशी अहवालानुसार, जिवती तहसील येथील आहरण व संवितरण अधिकारी यांचे बँक खात्यामधून भारतीय स्टेट बँकेच्या अशासकीय खात्यात एकूण ३४,०१,५००/- इतकी रक्कम वळती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले. तद्नंतर, सदर प्रकरणी तत्कालीन महसूल अधिकारी यांनी दिनांक २३/०१/२०२५ रोजी रु.३४,२४,६००/- इतक्या रक्कमेचा डी.डी. (डिमांड ड्राफ्ट) तहसीलदार, जिवती यांच्याकडे जमा केलेला आहे.

सदर प्रशासकीय तसेच वित्तीय अनियमिततेस जबाबदार असलेल्या सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत चौकशी पथकाने शिफारस केली आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालयाकडून सर्व संबंधितांवर फौजदारी कारवाई व विभागीय चौकशी करुन शिस्तभंगाची कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोपर काल्हेर (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील दोस्ती ग्रुप या विकासकाविरोधात केलेल्या आंदोलनाबाबत

**(१६) * १९५२ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपर काल्हेर (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील दोस्ती ग्रुपच्या बांधकाम व्यावसायिकाने मोठ्या प्रमाणात स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी मोबदला न देता बळकविल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जमिनमालकांनी सदरहू बिल्डरकडे वारंवार जमिनीच्या मोबदल्याची मागणी केली असता त्यांच्या कुटूंबियांना व्यावसायिकाच्या गुंडांकडून त्रास देण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त व्यावसायिकाने सदर शेतकऱ्यांच्या जागेत सक्तीने मातीचा भराव केला असून यात स्थानिक पोलीस प्रशासनाचा सहभाग असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिकांनी दोस्ती बांधकाम व्यावसायिकाच्या मुख्य प्रवेशद्वारावर दिनांक १४ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास ठिय्या आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्थानिक शेतकऱ्यांना बाजारभावाप्रमाणे जमिनीचा मोबदला देण्याबाबत तसेच दोषी व्यावसायिक व संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३), (४), (५) व (६) कोपर काल्हेर (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील दोस्ती ग्रुप या बांधकाम व्यवसायिकाने स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी मोबदला न देता बळकावल्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार स्थानिक शेतकऱ्यांकडून तहसीलदार भिवंडी यांचेकडे प्राप्त झालेली नाही. तसेच नारपोली पोलीस स्टेशन मध्ये मौजे-कोपर, काल्हेर, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील दोस्ती ग्रुप या विकासकाविरोधात कोणत्याही प्रकारचे गुन्हे अगर तक्रारी दाखल नाहीत.

तसेच विकासकाकडून स्थानिक शेतकऱ्यांना बाजारभावाप्रमाणे जमिनीचा मोबदला देणे ही बाब खाजगी स्वरुपाची असून शासनाशी संबधित नाही.

विकासक मे.अद्रिका डेव्हलपर्स (दोस्ती ग्रुप) यांनी मौजे कोपर येथील स.नं.११/१२ क्षेत्र ०.३२.१०, पो.ख. ०.०१.०० या त्यांच्या मिळकतीमध्ये केलेल्या माती भरावाबाबत तलाठी साझा काल्हेर यांनी चौकशी करुन दिनांक १०/०६/२०२१ रोजी तहसीलदार भिवंडी यांना अहवाल सादर केला होता. सदर अहवालाच्या अनुषंगाने निवडणूक नायब तहसीलदार, भिवंडी, मंडळ अधिकारी खारबांव व तलाठी साझा, कोपर यांची समिती गठीत करुन दिनांक १०/०८/२०२३ रोजी तपासणी केली असता सदर मिळकतीमध्ये एकूण २२,२६५ ब्रास माती भराव व ३५८ ब्रास दगड उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने तत्कालीन तहसीलदार, भिवंडी यांनी मौजे कोपर येथील स.नं.११/१२ या जमिनीमध्ये एकूण १७४३ ब्रास अनधिकृत विनापरवानगी केलेल्या माती भरावाबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४८ (७) नुसार रक्कम रु.१,१५,०३,८००/- (अक्षरी रुपये एक कोटी पंधरा लाख तीन हजार आठशे) दंडनीय आदेश दिनांक १५/०१/२०२४ रोजी पारीत केले होते व मे.अद्रिका डेव्हलपर्स प्रा.लि. यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये दंडनीय रक्कम वसूलीबाबत नोटीस देण्यात आली होती.

तद्नंतर मे.अद्रिका डेव्हलपर्स प्रा.लि. यांनी तहसीलदार, भिवंडी यांचे दिनांक १५/०१/२०२४ रोजीचे आदेशाविरुध्द उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांचे न्यायालयात अपिल दाखल केले होते. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांनी दिनांक १०.०२.२०२५ रोजी तहसीलदार भिवंडी यांचे सदरचे आदेश रद्द करुन त्यांना प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने फेरचौकशी करुन फेरआदेश करण्याबाबत आदेश पारित केले असून त्यानुसार तहसीलदार, भिवंडी यांनी कार्यवाही सुरु केली असून जिल्हा खनिकर्म अधिकारी, ठाणे यांना तहसीलदार भिवंडी यांनी दिनांक ०७/०३/२०२५ रोजीचे पत्रान्वये तांत्रिक मोजणी करण्याबाबत कळविले आहे.

विकासक मे.अद्रिका डेव्हलपर्स (दोस्ती ग्रुप) यांनी शेतकऱ्याच्या जागेत सक्तीने मातीचा भराव केल्याबाबत नारपोली पोलीस ठाण्यास तक्रार प्राप्त नसून यांच्याशी पोलीस प्रशासनाचा कोणत्याही स्वरुपाचा सहभाग नाही.

दोस्ती ग्रुपने स्थानिकांच्या जमिनी विकासकामासाठी घेऊन त्याचा मोबदला न देता जमिनी हडपण्याचा प्रयत्न केला व सदर ठिकाणी स्थानिक लोकांना कामे न देता बाहेरील लोकांना कामे दिल्यामुळे स्थानिकांना न्याय मिळवून देण्याकरीता स्थानिक खासदार यांचे नेतृत्वाखाली दोस्ती बांधकाम व्यावसायिकाच्या मुख्य प्रवेशद्वारावर दिनांक १४.१२.२०२४ रोजी ठिय्या आंदोलन करण्यात आले होते. सदर वेळी दोस्ती ग्रुप मॅनेजमेंट, स्थानिक खासदार यांची व बाधित शेतकरी यांची दिनांक २१/१२/२०२४ रोजी एकत्रित बैठक लावण्याचे आश्वासन दिल्यानंतर सदरचे ठिय्या आंदोलन स्थगित करण्यात आले.

-----------------

## राज्यात विशेषत: पालघर जिल्ह्यात नैसर्गीक वनसंपदा असलेल्या क्षेत्रफळाचे वनक्षेत्र घटल्याबाबत

**(१७) * १४१४ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वनसंपदा क्षेत्रात घट होत असल्याने पर्यावरणाचा समतोल व पशुपक्ष्यांचे संवर्धन होण्याकरीता वन विभागाकडून एकूण २४८.३८ चौरस कि.मी. क्षेत्र राखीव वनक्षेत्र म्हणून घोषित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त वनक्षेत्रापैकी तब्बल ८७ चौरस किलोमीटर वनक्षेत्र म्हणजे ३५ टक्के क्षेत्र घटल्याची माहिती इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट अहवालातून निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन व पोलीस विभागाच्या दुर्लक्षामुळे भूमाफियांकडून वन जमिनीवर अतिक्रमण व मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांमुळे या परिसरातील हरितपट्टा नष्ट होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन वन जमिनीवरील अतिक्रमण रोखणे, अनधिकृत बांधकामे निष्कासित करणे, वनक्षेत्र संरक्षण करण्याबाबत तसेच यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यात डहाणू व जव्हार या वन विभागांचा समावेश होतो. पालघर जिल्ह्यामध्ये पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी व पशुपक्ष्यांचे संवर्धन होण्यासाठी डहाणू व जव्हार विभागांतर्गत अनुक्रमे ११४७.९९ चौ.किमी व ८९४.९९ चौ.किमी वनक्षेत्र घोषीत करण्यात आलेले आहे.

सन २०२१ मध्ये इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट अहवालामध्ये अविभाजीत ठाणे जिल्ह्याचा समावेश आहे. तथापि, डहाणू वन विभागात सन २०२१ च्या तुलनेत सन २०२३ मध्ये ३५ टक्के वनक्षेत्र घटल्याचे दिसून येत नाही.

मुख्यत्वे डहाणू वन विभागामध्ये सार्वजनिक/विकासात्मक प्रकल्पांसाठी वनसंवर्धन कायद्यांतर्गत केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगीने वृक्षतोड झाली असून त्याबदल्यात पर्यायी वनीकरण राज्यातील इतर जिल्ह्यामध्ये प्रस्तावित आहे. तसेच वन विभागाच्या क्षेत्रावर अवैध वृक्षतोड/अवैध वाहतूक आढळून आल्यास भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या अंतर्गत दोषींविरुध्द वनगुन्हे नोंदविण्यात आले आहेत. तसेच संबंधित दोषींविरुध्द नुकसान भरपाई वसूल करणे, वाहने जप्त करणे, दंड आकारणीसह अन्य दंडात्मक उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

वन जमिनीवरील अतिक्रमण रोखणे, अनधिकृत बांधकामे निष्कासित करणे, वनक्षेत्र संरक्षण करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते :-

१. DGPS द्वारे सर्व्हे करुन सिमानिश्चीत करण्यात येत आहेत.

२. संवेदनशील क्षेत्राचे सर्व्हेक्षण व सिमांकन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

३. अतिक्रमण निर्मुलनधारकांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत कलम ५३, ५४ खाली नोटीस देण्यात येत आहेत.

४. अतिक्रमण निर्मुलनासाठी इतर विभाग जसे जिल्हाधिकारी, वसई-विरार शहर महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य विद्युतमंडळ तसेच जिल्हापरिषद विभाग यांचेशी समन्वय साधण्यात येत आहे.

५. वनक्षेत्राचे संरक्षणाचे दृष्टीकोनातून नियमित रात्रगस्त करण्यात येत आहे. तसेच वनोपज तपासणी नाका बळकटीकरण करण्यात येत आहे.

६. दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

७. ग्रामीण सहभागातून व्यवस्थापन अंतर्गत वनसंरक्षण समिती, संयुक्त वन व्यवस्थापन समिती यांच्यामार्फत जनजागृतीचा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.
८. वन आच्छादनामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने विविध योजनेंतर्गत रोपे लागवड करण्यात आली असून सन २०२५ च्या पावसाळ्यातील रोपवनाचे नियोजन करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे येथील बार्टीच्या निबंधकाची विभागीय चौकशी सुरु असल्याने त्यांना पदावनत करण्याबाबत**

**(१८) * ४२०० श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (बार्टी) निबंधक यांचा मनमानी कारभार, अनियमितता व सदोष कार्यपध्दतीबाबत दिनांक १२ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनाने त्यांची चौकशी सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित निबंधक ह्या चौकशी कालावधीत त्याच ठिकाणी असल्याने विभागीय चौकशीत अडथळा निर्माण होऊन संबंधित कागदपत्रे त्यांच्याकडून गहाळ करण्यात येऊन प्रशिक्षणार्थीवर दबाव टाकला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत दिनांक ६ नोव्हेंबर, २०२३ रोजीपासून अनेकदा तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देऊन चौकशीच्या कार्यकाळात संबंधित निबंधक यांना पदावनत करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासनास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे खरे आहे,

कामकाजातील गंभीर अनियमितता व सदोष कार्यपध्दतीसंबंधी निबंधक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्याविरुध्द दिनांक ०८.०६.२०२३ च्या शासन ज्ञापनान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली होती.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) हे खरे आहे,

निबंधक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याविरुध्द सुरु करण्यात आलेल्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांनी त्यांच्या दिनांक २८.०३.२०२४ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार निबंधक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी त्यांच्यावर बजावण्यात आलेल्या नोटीशीच्या अनुषंगाने सादर केलेले खुलासे कार्यालयातील उपलब्ध नस्त्यांच्या आधारे कार्यालयातील अन्य वरिष्ठ अधिकारी यांच्यामार्फत पडताळणी केली असून, त्यामध्ये कोणतीही प्रशासकीय तसेच आर्थिक अनियमितता न आढळल्यामुळे सर्व नोटीसींचा खुलासा मान्य करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने महासंचालकांचा अहवाल प्रमाण मानून निबंधक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांची विभागीय चौकशी सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने दिनांक १५.०७.२०२४ च्या शासन आदेशान्वये बंद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथे महिला बचतगटांसाठी कृषी उपकरणे वाटपाच्या योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१९) * ७७६ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे महिला बचतगटांसाठी कृषी उपकरणांच्या खरेदीसाठी सन २०२१-२२ या वर्षात खनिज विकास निधीतून देण्यात आलेल्या रु.८.७१ कोटी निधीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधीतून खरेदी व वाटप करण्यात आलेली उपकरणे अत्यंत निकृष्ट दर्जाची व वापरण्यायोग्य नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही बचतगटांच्या १० टक्के रक्कम त्रयस्थ व्यक्तींनी जमा करणे, या योजनेतील निधीचा गैरवापर करणे, काही बचतगट नोंदणीकृत नसणे, काही बचतगटांच्या नावावर परस्पर निधी उचलणे इ. अनेक अनियमितता झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेत झालेल्या गैरव्यवहारामुळे नागपूर येथील विविध महिलांच्या बचतगटांनी आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सदर योजना डी.बी.टी. (थेट लाभ हस्तांतरण) तत्त्वावर राबविण्यात आलेली आहे. नोंदणीकृत १०० बचत गटांनांच या योजनेत सहभागी करुन घेण्यात आले आहे. शासकीय यंत्रणेने उपकरणे खरेदी केली नाहीत. तर महिला बचत गटांनी १० टक्के स्वहिश्याची रक्कम भरल्यानंतर तसेच कृषी अवजारे स्वत: खरेदी करुन सहायक आयुक्तांच्या कार्यालयास पावत्या सादर केल्या आहेत. त्यानंतर तालुका समन्वयक यांनी प्रत्यक्ष स्थळी भेटी देऊन स्थळपाहणी अहवाल सादर केल्यानंतरच बचत गटांच्या खात्यात ९० टक्के रक्कम RTGS द्वारे जमा करण्यात आलेली आहे.

(४), (५) व (६) हे अंशत: खरे आहे, दोन बचत गटातील महिलांनी बचत गटाच्या पदाधिकारी व एजन्सीने फसवणूक केली म्हणून आंदोलन केले आहे. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांचेकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सहायक आयुक्त, नागपूर यांनी चौकशी समिती नेमली. समितीच्या चौकशीत बचत गटाच्या पदाधिकारी व एजन्सीने फसवणूक केल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे. सदर अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

-----------------

## बोरीवली, दहिसर व मुंबई येथील हाजी अली मोहम्मद (हाजी कासम) यांच्या मालकीच्या जमिनी बनावट सह्या व खरेदी खताच्या आधारे विकत घेत असल्याबाबत

**(२०) * १४६८ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात बनावट खरेदी खत व प्रॉपर्टी कार्ड तसेच कोर्ट रिसिव्हरच्या बनावट सह्या करुन बोरीवली, दहिसर व मुंबई येथील हाजी अली मोहम्मद (हाजी कासम) यांच्या ६४४ एकर जमीन श्री.नानवणी व श्री.व्ही.के.लाल यांनी विकत घेतल्याचे दिनांक २८ जुलै, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयातील भूमापन अधिकारी व भूमी अभिलेख अधिकारी तसेच इतर अन्य संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमातने यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपाध्यक्ष, महाराष्ट्र ओ.बी.सी. सेना व श्री.शरद भोवर, जागा मालक यांनी सी.आय.डी. पोलिसांमार्फत चौकशीची मागणी मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री महोदयांकडे दिनांक २८ जुलै, २०२४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) श्री.शरद भोवर, महाराष्ट्र ओ.बी.सी. सेना यांचे मा.मुख्यमंत्री यांचेकडे केलेले दिनांक ०९.०६.२०२२ व ११.०९.२०२३ रोजीचे निवेदन अनुक्रमे मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, कोकण विभाग व निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्यामार्फत जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, मुंबई उपनगर या कार्यालयास प्राप्त झाले आहे.
(३) व (४) नगर भूमापन विभागाच्या मूळ अभिलेखानुसार नगर भूमापन दहिसर येथील न.भू.क्र.२४२३ ते २४२७ व २३३२, २३३३, २३३३/१ ते २१ या मिळकतीचे मिळकतपत्रिकेवर सन १९६८ मध्ये नगर भूमापन चौकशीवेळी विकयलाल इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा.लि. यांचे नाव धारक म्हणून व इमला मालक सदरी इतर यांची नावे घोषित झाली असून आजतागायत कायम आहेत. सदर मालकी हक्काबाबत आक्षेप असल्यास हितसंबंधितांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २४७ अन्वये दाद मागणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे श्री.शरद भोवर यांच्या निवेदनास अनुसरुन नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांनी त्यांना दिनांक १६.०३.२०२१, १४.०७.२०२२, २१.१२.२०२३ व १०.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### राज्यातील अनेक जिल्ह्यात सौरऊर्जा प्रकल्प उभारणीकरिता होत असलेली अवैध वृक्षतोड

**(२१) * १३८९ श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक जिल्ह्यात सौरऊर्जा प्रकल्प उभारणीकरिता मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड होत असून प्रशासनाने व ठेकेदार कंपनीने चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे बेकायदेशीरपणे काही अटी घालून वृक्ष तोडण्यास दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास परवानगी दिली होती, हे खरे आहे काय,
(२) तसेच सौरऊर्जा प्रकल्प कंपनीने ग्रामस्थांची दिशाभूल करुन ५२ एकर गायरानापैकी १७ एकर जमीन ताब्यात घेऊन या कंपनीकडून गावाला कोणत्याही प्रकारचा मोबदला दिला नसून याप्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी याकरिता उपोषण करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी केलेल्या तक्रारी, निवदने, मागणी, नोटीस याकडे स्थानिक वनाधिकारी यांचेसह प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच अवैध वृक्षतोड थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२), (३) व (४) सौरऊर्जा प्रकल्प उभारणीकरिता कायदेशीर वृक्षतोड परवानगी देण्यात आली असून, अमरावती वनवृत्तांतर्गत अकोला व बुलढाणा वन विभागात एकूण २८२८ आणि छत्रपती संभाजीनगर वनवृत्तांतर्गत बीड, हिंगोली व छत्रपती संभाजीनगर वन विभागात एकूण २१९२ वृक्षतोडीस कायदेशीर परवानगी देण्यात आलेली आहे.

तसेच सांगली वनविभागातील कडेगांव पलूस वन परिक्षेत्रातील मौजे शिरसगांव येथील गट क्र.७०६/०१ येथे ४६६ झाडांना तोडीस परवानगी देण्यात आली होती. तथापि, ४६६ झाडांव्यतिरिक्त २६८ झाडे विना परवाना तोडल्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल (झाडांच्या हक्कांचे नियमन इ.) नियम, १९६७ नुसार उप सरव्यवस्थापक MSKVY 5th Solar SPV LTD, सांगली यांच्याकडून रु.२,६८,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

याव्यतिरिक्त, धुळे वनवृत्तातील जळगाव वनविभागांतर्गत चाळीसगाव वनक्षेत्रात मौजे शिंदखेडा येथील सरकारी गावठाण गट क्र.३२/१७ मध्ये एकूण १८ व मौजे डोणदिगर येथील सरकारी गावठाण गट क्र.२६९ मध्ये एकूण १६६ झाडांची तसेच मौजे जामठी येथील गावठाण गट क्र.८/१ मध्ये एकूण २३ झाडांची विनापरवानगी तोड केल्याचे निदर्शनास आले असून, सदर प्रकरणी महाराष्ट्र वृक्षतोड (नियमन) अधिनियम, १९६४ व महाराष्ट्र वृक्षतोड (नियमन) नियम, १९६७ नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच जळगांव वनविभागात चाळीसगाव वनपरिक्षेत्रात यासंदर्भात २ तक्रारी प्राप्त झाल्या असून, सदर प्रकरणी चौकशीअंती मेधा इंजिनिअरिंग ॲन्ड इन्फास्ट्रक्चर लिमिटेड टेक्नोक्रिएट इस्टेट, बालानगर, हैद्राबाद या कंपनीला एकूण रु.१,३६,०००/- दंड आकारण्यात आला असून तो कंपनीकडून वसूल करण्यात आला आहे.

तसेच मुक्ताईनगर वनपरिक्षेत्रात मौजे जामठी ता.बोदवड येथे M.S.V.K.Y. थर्टीन सोलर SPV लिमिटेड या कंपनीमार्फत एकूण २३ वृक्षांची विनापरवानगी तोड केल्याने महाराष्ट्र वृक्षतोड (नियमन) अधिनियम, १९६४ अंतर्गत रु.८०००/- दंड वसूल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अनेक जिल्ह्यात विशेषत: मालेवाडा-भिवापूर (नागपूर) व मानोरा (वाशिम) येथे अवैधरित्या सागवान झाडे तोडल्याबाबत

**(२२) * ५१८९ श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती सई डहाके (कारंजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक जिल्ह्यात व विशेषत: मालेवाडा-भिवापूर (नागपूर) व मानोरा (वाशिम) येथे महसूली जमिनीवर व पाणंद रस्त्यावरील अवैधरित्या सागवान झाडे तोडल्याचे माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच शासन वृक्ष लागवडीवर दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करीत असताना खाजगी इमारतीसाठी लागणारे लाकूड व फर्निचर बनवण्यासाठी जंगलातील बहुमूल्य सागवान वृक्षांची कत्तल होत असून सागवान माफीया व

लाकूड ठेकेदार हे वन अधिकाऱ्यांशी संगनमत करुन वृक्षतोड करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध वृक्षतोड करणाऱ्या संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) (२) व (३) मालेवाडा-भिवापूर (नागपूर) व मानोरा (वाशिम) येथील महसूली जमिनीवर व पाणंद रस्त्यावरील अवैधरित्या सागवान झाडे तोडल्याचे माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले नाही. तथापि, दक्षिण उमरेड वन परिक्षेत्रातील मौजा मांगरुड येथे खाजगी शेत सर्व्हे क.३० व ८० च्या लगत असलेल्या सरकारी पाणंद रस्त्यावरील ४ सागवान झाडे विनापरवानगी तोडल्याचे आढळून आले असून सदर प्रकरणी दिनांक ०७.०२.२०२५ रोजी वन गुन्हा नोंदविण्यात आला असून सागवान ८ नग, ०.६६९ घ.मी. माल तसेच सागवान जलावू अर्धा भर जप्त करण्यात आलेला आहे.

माहे जानेवारी-फेब्रुवारी २०२५ मध्ये महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम, १९६४ नुसार भिवापूर तहसीलमध्ये एकूण ६१ खाजगी क्षेत्रातील प्रकरणांना तसेच मानोरा वनपरिक्षेत्रांतर्गत एकूण १७ खाजगी क्षेत्रातील प्रकरणांना वृक्षतोडीची परवानगी देण्यात आली आहे. तसेच दक्षिण उमरेड वनपरिक्षेत्रातील मौजा मांगरुड येथे खाजगी शेत सर्व्हे क.८० प.ह.नं.४४ येथील ८ सागवान झाडांची वन विभागाची रितसर परवानगी न घेता वृक्षतोड करण्यात आली असून त्याविरुध्द दिनांक ०९.०२.२०२५ रोजी वन गुन्हा नोंदवून जप्त माल सरकारजमा करण्यात आला असून आरोपींकडून रु.८०००/- वसूल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पारखेड (ता. खामगाव, जि.बुलढाणा) येथे गौण खनिजाची अवैध विक्री होत असल्याबाबत

**(२३) * १२६२ श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारखेड (ता.खामगाव, जि.बुलढाणा) गावातील भाग दोन मधील गट क्रमांक ३३६ व ३३८ मधील खाण शासनाने बंद केली असतानाही या खाणीतून यंत्राद्वारे स्फोट करुन मोठ्या प्रमाणात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी ग्रामस्थांनी संबधित विभागाकडे तक्रारी करुनही प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे शासनाच्या महसूलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

दैनिक वृत्तपत्रात दिनांक ०१.०१.२०२५ रोजी "शासनाने बंद केलल्या दगड खादानीत स्फोटाव्दारे उत्खनन" या मथळ्याखाली बातमी प्रसिध्द झाली. त्यानुषंगाने तहसीलदार, खामगांव यांनी केलेल्या चौकशीत मौजे पारखेड येथील गट नंबर ३३६ मध्ये खाणपट्टा धारक यांना मंजूर करण्यात आलेल्या खाणपट्ट्याचा कालावधी दिनांक ०६.०३.२०२४ रोजी संपला असून, सदर खाणपट्टा बंद करण्यात आलेला आहे व ग.नं.३३८ मधील खाणपट्ट्यामध्ये

पाणी असल्यामुळे सदर खाणपट्टा बंद आहे. ग.नं.३३६ व ३३८ मध्ये आज रोजी पाणी असून त्यामध्ये कोणतीही ब्लास्टींग झालेली नसल्याचे दिसून आले आहे. ग.नं.३३६ मधुन दगडापासून तयार केलेली ५००० ब्रास परिमाणाची विक्रीकरीता महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ७१ अन्वये विक्रेता लायसन्स देण्यात आलेले असून, त्याची मुदत दिनांक ०१.०१.२०२५ त ३१.१२.२०२५ पर्यतच्या कालावधीसाठी जिल्हाधिकारी, बुलढाणा कार्यालयाकडून देण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) मौजे पारखेड, ता.खामगांव, जि.बुलढाणा येथील गावकरी/ग्रामस्थांनी मौजे पारखेड भाग २, ता.खामगांव येथील ग.नं.३३६, ३३७ व ३३८ मध्ये उत्खनन परवाना नसतांना अवैधरित्या उत्खनन सुरु असल्याबाबत तहसीलदार, खामगांव यांना तक्रार अर्ज प्राप्त झाला. त्यानुषंगाने तहसीलदार, खामगांव यांनी केलेल्या चौकशीअंती मौजे पारखेड येथील ग.नं.३३६ मधील खाणपट्टयाची मुदत संपलेली असल्याने सील करण्यात आले आहे. ग.नं.३३८ मधील खाणपट्टयात पाणी भरलेले असल्याने खाणपट्टा बंद आहे. सदर ठिकाणी उत्खनन सुरु असल्याचे दिसून आले नसल्याचे तक्रारदार यांना तहसीलदार, खामगांव यांनी दिनांक २६.०७.२०२४ रोजी कळविले आहे.

बुलढाणा जिल्ह्यामध्ये अवैधरित्या अवैध उत्खनन व वाहतूकीवर आळा घालण्याच्या दृष्टीने उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली भरारीपथक नियुक्त केले आहे. तसेच तालुकास्तरावर तहसीलदार यांनी नायब तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली पथके स्थापन केली आहेत.

-----------------

## मौजे कांबे (ता.भिंवडी) येथील शासकीय गुरचरण, वन जमिनीवर विस्फोटक वापरुन अवैधरित्या उत्खनन होत असल्याबाबत

**(२४)** * **४४६२ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कांबे (ता.भिंवडी, जि.ठाणे) येथील शासकीय गुरचरण, वने जमीन सर्व्हे क्र.१४१/१२१/ १३२/१४०/१४२ मध्ये विनापरवानगी विस्फोटके वापरुन अवैधरित्या मोठ्या प्रमाणात उत्खनन होत असून शासनाच्या महसूलाचे नुकसान होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यसा, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी व वनक्षेत्रपाल (भिवंडी) यांच्याकडे संबंधितावर कारवाई करण्याची मागणी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासकीय जमिनींवरील अवैध उत्खनन रोखण्यासह दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) तक्रारदार यांच्याकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मौजे कांबे येथील स.नं.१०८/२ मध्ये ग्राम/महसूल अधिकारी यांनी दिनांक १३.०१.२०२५ रोजी केलेल्या स्थळ पाहणीत संबंधित हे विना परवानगी स्फोटाव्दारे दगड उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्याने तात्पुरते उत्खनन बंद करण्यात आले आहे.

दिनांक २८.०१.२०२५ रोजी ग्राम महसूल अधिकारी, जुनादुर्खी व मंडळ अधिकारी यांनी संयुक्तरित्या तहसीलदार यांना सादर केलेल्या अहवालात नियंत्रित स्फोट परवाने व ३८१.४९ ब्रास उत्खनन केल्याबाबत अहवाल सादर केला. त्याबाबत तहसीलदार भिवंडी यांनी दिनांक १७.०२.२०२५ अन्वये उत्खनन करण्यासाठी भरणा केलेली स्वामित्वधन याची परवानगी याबाबतची महिति व सुरुंग स्फोट (कंट्रोल ब्लास्टिंग) परवाना कोणत्या कार्यक्षत्रात

वापरण्याची मुभा आहे याबाबत माहिती सादर करण्याबाबत संबंधितास कळविण्यास आले आहे. सद्य:स्थितीत सदर दगड खाण बंद स्थितीत आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक १३.०१.२०२५ रोजी वनक्षेत्रपाल भिवंडी यांना प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या स्थळपाहणीत मौजे कांबे ता.भिवंडी येथील स.क्र.१४१ चे क्षेत्र राखीव वन असून सदर क्षेत्रात अवैध उत्खनन, ब्लास्टिंग, बांधकाम आढळून आलेली नाही. सर्व्हे नं.१२१, १३२, १४० हे खाजगी मालकी व ग.नं.१४२ हे. ग्रुप ग्रामपंचायत कांबे यांच्या मालकीचे आहे.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुका हद्दीतील मुंबई-नाशिक महामार्गावर ठेकेदारांकडून अनधिकृत माती उत्खनन केल्याबाबत

**(२५) * ३२९५ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुका हद्दीतील मुंबई-नाशिक महामार्गावर सुरु असलेल्या साईडपट्टीच्या कामात महामार्गालगतच्या परिसरातील टेकड्या फोडून विनापरवाना मातीचे उत्खनन करुन अनधिकृतरित्या भराव टाकण्यात येत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय आहे,

(२) असल्यास, उक्त महामार्गावरील कसारा ते आसनगावपर्यंत रस्त्याच्या दुतर्फा साईडपट्टी तयार करण्याचे काम इगतपूरी तालुक्यातील कंत्राटदार करीत असून अशाप्रकारे बेकायदेशीररित्या केलेल्या उत्खननामुळे शासनाच्या महसूलाचे मोठे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बेकायदेशीर उत्खनन कंत्राटदार व विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) शहापूर तालुक्यातील मौजे पुणधे येथील आयटीपी कंपनी ते चेरपोली घाटापर्यंत या ठिकाणी भूतल परिवहन राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ रस्त्याचे साईडपट्टीचे कामासाठी अंदाजे २ ब्रास प्रमाणे ६५ मातीचे ढिग असे १३० ब्रास माती टाकल्याचे आढळून आले आहे.

मौजे कसारा खुर्द, ता.शहापूर, जि.ठाणे येथील स.नं.११८/अ/३/१ मधुन अंदाजे ८५८ ब्रास मातीचे उत्खनन करुन सदर माती कसारा गेट हॉटेल ते न्यु मामा ढाबापर्यंत व शिरोल गावाचे हद्दीत भूतल परिवहन राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ रस्त्याचे साईडपट्टीचे कामासाठी वापरण्यात आली असल्याचे दिसून आले आहे.

यानुषंगाने राष्ट्रीय राज्य महामार्ग प्राधिकरण व संबंधित ठेकेदार यांना याबाबत खुलासा करण्याबाबत तहसीलदार, शहापूर यांनी नोटीसा बजाविल्या असून त्याबाबत सुनावणीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कणेरीवाडी (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथे खोटी व बनावट कागदपत्रे तयार करुन गौण खनिजाचे उत्खनन केल्याबाबत

**(२६) * ५९४० श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शेंडूर (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील गट नं.१९४ मध्ये सुरु केलेल्या “बालाजी स्टोन क्रशर” यांनी विनापरवानगा व रॉयल्टी न भरता गट नं.७२ येथील गौण खनिजाची नियमबाह्य उत्खनन केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बाब माजी जिल्हापरिषद सदस्य, कणेरीवाडी (ता.करवीर) यांनी तहसलीदार, कागल यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर सदर स्टोन क्रशन बंद करण्याचे आदेश तहसीलदार यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर स्टोन क्रशरचे कंत्राटदार यांनी मंडळ अधिकारी, तलाठी व सक्षम अधिकारी यांचेशी संगनमत करुन खोटे स्वामित्वधनाचे रेकॉर्ड तयार करुन शासनाची लाखो रुपयाची फसवणूक केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रॉयल्टीची वसूली करण्यासह दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मौजे शेंडूर, ता.कागल, जि.कोल्हापूर येथील ग.नं.७२ मध्ये गौण खनिज उत्खनन करण्यासाठी दिनांक २५.०४.२०२४ पर्यंतच्या कालावधीसाठी परवानगी देण्यात आलेली होती. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या अहवालानुसार सदर गटातून उत्खनन हे माहे एप्रिल, २०२४ पासून बंद आहे.
(२) मौजे शेंडूर, ता.कागल, जि.कोल्हापूर येथील ग.नं.१९४ मधील विनापरवाना बेकायदेशीर आरोग्यास हानी पोहचवणारा स्टोन क्रशर बंद करण्याबाबत दिनांक २३.०३.२०२३ व १७.०१.२०२५ रोजी तक्रार प्राप्त झालेली आहे. त्यानुषंगाने करण्यात आलेल्या चौकशीअंती सदर स्टोन क्रशर बंद करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) जिल्हाधिकारी यांच्या अहवालानुसार दिनांक १७.०१.२०२५ रोजी ग.नं.७२ मधील उत्खननाच्या अनुषंगाने अंतर जिल्हा पथक यांचेमार्फत दिनांक ०१.०३.२०२३ रोजी ETS मोजणी करण्यात आली, त्यामध्ये १३,०६७ ब्रास उत्खनन केल्याने आढळून आले. तथापि, दिनांक ०१.०३.२०२३ पर्यंत ग.नं.७२ चे मालक यांनी त्यापेक्षा जास्त १६,३७६ ब्रासचे स्वामित्वधन शासन जमा केले होते. तर त्यानंतर दिनांक २८.०२.२०२४ अखेर एकूण १७,४५६ ब्रास उत्खनन परिमाणचे स्वामित्वधन शासन जमा केलेले आहे. दिनांक ०५.०३.२०२५ रोजी उपसंचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, कोल्हापूर कार्यालयाचे भौगोलिक माहिती प्रणाली सहाय्यक, मंडळ अधिकारी भाग सिध्दनेर्ली व ग्राम महसूल अधिकारी, शेंडुर यांनी ETS मोजणी करण्यासाठी प्रत्यक्ष स्थळावर भेट देण्यात आली असता सदर ठिकाणी पाणी असल्याने मोजणी करता आलेली नाही. ETS मोजणी अंतिम झाल्यानंतर स्वामित्वधनाची अंतिम रक्कम निश्चित केली जाईल.
(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील भूमी अभिलेख विभागांतर्गत शेत जमीन व बिगर शेत जमीन नकाशे अद्ययावत करण्याबाबत

**(२७) * ९९४ श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाकडून भूमी अभिलेख विभागांतर्गत दर ३० वर्षांनी जमाबंदी व मोजणी करुन शेत जमिन व बिगर शेत जमिनीचे नकाशे तयार करणे अपेक्षित असताना अजूनही सन १९२७ पासून सुरु असलेल्या जमाबंदीचे नकाशे वापरात असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक गट क्रमांक अथवा सर्व्हे क्रमांक यांची मोजणी करुन गाव नमुना ६ ड प्रमाणे पोटहिस्सा अद्ययावत करुन त्यानुसार ७/१२ व ८ अ आणि गाव नकाशे अद्ययावत करणे व बिगर शेती परवानग्या व भूसंपादन यामुळे जमिनीचा आकार व क्षेत्रात होणारे बदल ७/१२ वरती घेणे, त्यानुसार नकाशे, टिपणबुक, कमीजास्त पत्रक, एकत्रीकरणानंतरच्या ९/३/४ च्या जंत्री यानुसार अद्यापही अद्ययावत नकाशे तयार नसल्याने नागरीकांना जमीनीची खरेदी व विक्री करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे उक्त प्रकारात एकाच गट क्रमांकातील हिस्सा खरेदी केल्यानंतर खातेदाराला हिश्याची मोजणी करताना संपूर्ण गट क्रमांकाचे मोजणी शुल्क भरावे लागत असून नागरीकांना आर्थिक भूर्दंड व वेळेचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन आवश्यक ती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ९३ मध्ये "जमाबंदी ही तीस वर्ष अंमलात राहील आणि अशी मुदत संपल्यानंतर ही जमाबंदी नव्या जमाबंदीची मुदत सुरु होईपर्यंत अंमलात असण्याचे चालु राहील" अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र राज्यात मूळ सर्व्हेक्षण व जमाबंदीचे काम सन १८९० ते १९३० या कालावधीत झालेले आहे. त्यामध्ये संपूर्ण महसूली गावांचे नकाशे तयार करण्यात आलेले आहेत. परंतु, राज्यात पुन्हा जमाबंदी झाली नसली तरी सन १९७० ते १९९३ या कालावधीत जमिन एकत्रीकरण योजना राबविण्यात येवून एकत्रीकरणापूर्वीचे झालेले पोट हिस्से यांचे एकत्रीकरण करण्यात आले व नकाशात समाविष्ट करुन गटनंबरचे नकाशे व ७/१२ अधिकार अभिलेख अद्ययावत करण्याची कार्यवाही झालेली आहे.

सद्य:स्थितीत अर्जदाराचे अर्जावरुन पोटहिस्सा व अकृषिक मोजणी करुन नकाशे व अधिकार अभिलेख अद्ययावत करण्यात येत आहेत. तसेच भूसंपादन अधिकारी यांचेकडून अंतिम निवाडा प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कमी जास्त पत्रकाची कार्यवाही करुन नकाशा व ७/१२ अधिकार अभिलेखामध्ये क्षेत्र व आकाराची नोंद अद्ययावत करण्यात येते.
(३) धारण जमिनीच्या ७/१२ अधिकार अभिलेखात अर्जदार व सहहिस्सेदार यांची नावे समाविष्ट असतात. त्यामध्ये पोट हिस्सा मोजणी करताना अर्जदार यांचे संबंधित गट नंबरमधील त्यांच्या हिश्श्याचे क्षेत्र व नेमकी हद्द निश्चित करण्यासाठी संबंधित गट नंबरमधील सर्व पोट हिश्श्यांची मोजणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे संपूर्ण गट/सर्व्हे क्रमांकासाठी विहित केलेल्या मोजणी शुल्क भरणे आवश्यक आहे.
(४) डिजिटल इंडिया भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत राज्यातील पोटहिस्सा मोजणी व नकाशा अद्यावतीकरण करणेकामी राज्यातील ६ विभागांतील प्रत्येकी २ तालुके असे एकूण १२ तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. सदर तालुक्यातील गावांमध्ये पोट हिस्सा मोजणी करुन नकाशा अद्यावतीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर राज्यातील सर्व गावांमध्ये अशा प्रकारची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामध्ये राज्यातील भूमी अभिलेख विभागांतर्गत शेत जमीन व बिगर शेत जमिनीचे नकाशे अद्ययावत होणार आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण विंधणे (जि.रायगड) येथील विरार-अलिबाग कॉरीडॉर भूसंपादन प्रक्रियेत झालेल्या जमीनीच्या गैरव्यवहाराबाबत

**(२८) * ३८३८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण विंधणे (जि.रायगड) येथील सन २०२० मध्ये विरार-अलिबाग कॉरीडोअर भूसंपादन प्रक्रियेत श्री.गेलाराम भुरोमल व अन्य चार जणांनी बेनी ब्रायन डिसोझा असल्याचे भासवून बनावट कागदपत्रांच्या आधारे ४ हेक्टर २७ गुंठे ही शासकीय जमीन सातबारावर बेकायदा नावाची नोंद करुन त्यातील काही जमीन श्री.हरेष हेमानीसह दोघांना १ कोटी ३६ लाखाला विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी तहसीलदार यांनी केलेल्या तक्रारीनुसार न्हावाशेवा पोलीस ठाण्यात दिनांक २२ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी करुन शासकीय जमीन ताब्यात घेण्याबाबत तसेच संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे

मौजे विंधणे, ता.उरण, जि.रायगड येथील विरार-अलिबाग कॉरीडोअर भूसंपादन प्रक्रियेत श्री.बेनी ब्रायन डिसोझा नावाच्या व्यक्तीने ते स्वत: श्री.गेलाराम भुरोमल असल्याचे भासवून बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय जमीनीच्या ७/१२ वर बेकायदा नावाची नोंद करुन शासकीय जमीन श्री.हरेष हेमानी व इतर यांना विक्री केली आहे.

(२) होय.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी आरोपीविरुध्द न्हावा शेवा, पोलीस ठाणे, ता.उरण येथे गुन्हा रजिस्टर नंबर १४६/२०२४ अन्वये दिनांक २०.०९.२०२४ रोजी एफ.आय.आर. नोंदविण्यात आला आहे. प्रस्तुत जमिनीचे हस्तांतरण बेकायदेशीर असल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २५७ नुसार बेकायदेशीर दस्ताचे आधारे मंजूर करण्यात आलेली फेरफार उपविभागीय अधिकारी, पनवेल यांचे न्यायालयामध्ये अपिल क्र.२३७/२०२४ अन्वये पुनर्विलोकनात घेण्यात आलेली असून प्रस्तुत हस्तांतरण नोंदीत स्थगिती देण्यात आलेली आहे.

-----------------

## महाबळेश्वर (जि.सातारा) येथे कोयना खोऱ्यातील झाडाणी गावातील जमीन शासकीय अधिकाऱ्यांनी खरेदी केल्याबाबत

**(२९)** * **८९८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाबळेश्वर (जि.सातारा) तालुक्यातील व्याघ्र प्रकल्पालगतच्या कोयना खोऱ्यातील झाडाणी गाव या संवेदनशील क्षेत्रातील ६२० एकर जमीन शासकीय उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी खरेदी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जमिन खरेदी ही कमाल जमीन धारणा कायद्याचे उल्लंघन करणारी असून सदर जमीन शासनजमा करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असे असतानाही सदर अधिकाऱ्यांनी सातारा, रायगड, पुणे, ठाणे व नंदुरबार येथे देखील मोठ्या प्रमाणात अतिरिक्त जमीन बेकायदेशीररित्या खरेदी केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जिल्ह्याच्या अप्पर जिल्हाधिकाऱ्यांची दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास चौकशी समिती नेमण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करुन या जमिनी तात्काळ शासनजमा करण्याबाबत तसेच यातील दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ च्या तरतुदीनुसार सिलिंग मर्यादेपेक्षा अधिकची जमीन धारणा केली आहे किंवा कसे याबाबत तपासणी करण्याकरीता अपर जिल्हाधिकारी, पुणे, अपर जिल्हाधिकारी, रायगड व अपर जिल्हाधिकारी, नंदुरबार यांची चौकशी अधिकारी म्हणून दिनांक १३.०१.२०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. अहवालातील निष्कर्षाअंती कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड शहरातील पीआर कार्डच्या अनियमिततेबाबत

**(३०)** * **४५१९ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) बीड शहरात पीआर कार्डच्याबाबतीत मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणांमध्ये संचिका गहाळ करणे, संबंधित प्रकरणांचे पुरावे कागदपत्रे नष्ट करणे, संबंधित व्यक्तींशी संगनमत करणे, बनावट पीआर कार्ड तयार करणे इत्यादी अनेक अनियमितता होत असून याबाबतच्या तक्रारी शासनाकडे करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीड शहरातील अनेक ठिकाणाच्या जमिनी महसूल विभागाने नगरविकास विभागाकडे वर्ग केल्या असून यात झालेल्या अनियमिततांची खातेनिहाय चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी करुनही त्यावर अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नागरीकांची फसवणूक होऊ नये याकरीता उक्त प्रकरणांची तसेच यापूर्वीच्या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करुन यास जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

बीड शहरातील मिळकतींच्या मिळकतपत्रिकेंमध्ये अनियमितता असल्याचे सन २०११ मध्ये निदर्शनास आले हे खरे आहे.
(२) मा.लोकप्रतिनिधींनी अशा प्रकारे तक्रारी शासनाकडे केलेल्या आहेत हे खरे आहे. तथापि, संचिका गहाळ करणे, संबंधित प्रकरणांचे पुरावे कागदपत्रे नष्ट करणे, संबंधित व्यक्तींशी संगनमत करणे, बनावट पीआर कार्ड तयार करणे अशी बाब आढळून आलेली नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) बीड शहराच्या नगर भूमापनावेळी झालेल्या अनियमिततांबाबत चौकशी करण्यासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांनी गठीत केलेल्या तपासणी पथकाने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार बीड शहरामध्ये असलेल्या अंदाजे ६०००० मिळकतींपैकी ८५० मिळकतींची सविस्तर मोजणी करुन मिळकतपत्रिका तयार करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित मिळकतींची मोजणी व हक्क चौकशीचे काम कालबध्द आराखडा तयार करुन पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. उप अधीक्षक भूमी अभिलेख, बीड कार्यालयाच्या आस्थापनेवर कर्मचारी संख्या अपुरी असल्याने तसेच कार्यालयात प्राप्त होणारी नागरिकांची दैनंदिन मोजणी कामे, नगर भूमापनाकडील फेरफार प्रकरणे, कोर्ट कमिशन, रेल्वे भूसंपादन, राष्ट्रीय महामार्गाचे भूसंपादन इत्यादी कामांमुळे सदर कामास विलंब झालेला आहे.

-----------------

### गंगाखेड (जि.परभणी) येथील विहीरींच्या कामात गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(३१)** * **५३५८ श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने रोजगार हमी योजनेंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी विहीर, शेततळे व गाय गोठा आदी कामांसाठी मंजूरी व शासनाकडून देण्यात येणारे अनुदान मोठ्या प्रमाणात प्रलंबित असून त्यात अनेक ठिकाणी गैरव्यवहार होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गंगाखेड (जि.परभणी) येथे अल्पभूधारक शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत विहीर मंजूरीसह विहीरीचे काम पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून ५० ते ६० हजार रुपये घेण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर योजनेंतर्गातील कामांना मंजूरी व अनुदान सत्वर वितरित करण्याबाबत तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### पुणे व सोलापूर जिल्ह्यांमधील निकृष्ट दर्जाचे खत व बियाणे आढळलेल्या दुकानदार व उत्पादक कंपन्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(३२)** * **२२५० श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व सोलापूर या जिल्ह्यांमध्ये गेल्या काही वर्षात जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत खते व बियाण्यांचे नमुने निकृष्ट आढळल्याने दुकानदार व उत्पादक कंपन्यांच्या विरोधात दाखल केलेल्या गुन्ह्यांमध्ये एकाही आरोपीला शिक्षा झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर जिल्ह्यांत दुकानदार व उत्पादक कंपन्यांच्या विरोधात दाखल गुन्ह्यांमध्ये कृषी विभागाचे अधिकारी न्यायालयात हजर न झाल्याने बहुतांश खटले रद्द करुन न्यायालयीन प्रकरणांचा आढावा न घेता शेतकऱ्यांना फसविणाऱ्या कंपन्या, दुकानदार व नियंत्रक अधिकारी यांच्यावर कारवाई होत नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मान्सून खत (फर्टिलायझर) या अस्तित्वात नसलेल्या बनावट खत कारखान्याला परवानगी देणाऱ्या तत्कालीन कृषी संचालकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली नसून पारा ही विद्राव्य खत तयार करणारी कंपनी फक्त मिठाने भरलेली पोती चार हजार रुपयांना विकत असतानाही दुकानदारावर किरकोळ गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात कृषी सेवा केंद्राकडून मानधनावर सेवानिवृत्त अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली असून या कंत्राटी अधिकाऱ्याने चार वर्षांत कोणतेही कार्यालयीन काम न करता २५ लाख रुपयांची शासनाची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, गुणवत्ता नियंत्रण विभागात काम करणारे अनेक अधिकारी किमान पात्रता पूर्ण करीत नसून कृषी गुणवत्ता नियंत्रण विभागाच्या विरोधात तक्रारी प्राप्त होऊन अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही, हे हो खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) पुणे व सोलापूर जिल्ह्यांमध्ये अत्यावश्यक वस्तू कायद्यांतर्गत अप्रमाणित बियाणे व खतांसदर्भात संबंधित उत्पादक/विक्रेते यांचे विरोधात कोर्ट केसेस/पोलीस केसेस दाखल करण्यात आल्या असून त्यांच्याविरुद्ध न्यायालयीन कार्यवाही/पोलीस तपास सुरु आहे. बियाण्याच्या दोन प्रकरणांमध्ये दोषींना शिक्षा झाली आहे.
(२) हे खरे नाही.

अप्रमाणित बियाणे व खतांसदर्भात उत्पादक/विक्रेते यांचे विरोधात दाखल न्यायालयीन दाव्याबाबत नियमीत आढावा घेतला जात असून कृषि विभागाचे अधिकारी न्यायालयात हजर न झाल्यामुळे खटले रद्द झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आली नाही.
(३) मान्सून फर्टिलायझर प्रकरणी तत्कालीन कृषी संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण) यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी करण्यात आलेली असून विभागीय चौकशीअंती त्यांना दोषमुक्त करण्यात आले आहे.

पारा ही पाण्यात विद्राव्य खते तयार करणारी कंपनी नसून यारा कंपनीच्या पाण्यात विद्राव्य १२:६१:० खताची नक्कल करुन शेतकऱ्यांना बोगस खते विक्री प्रकरणी संबंधितांवर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४), (५) व (६) हे खरे नाही.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत विहीरींना मान्यता देण्याच्या प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(३३) * २७७२ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत विहीरींना मान्यता देण्याच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून याची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पंचायत समितीच्या सभेत दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) चौकशी करण्यात आलेली असून चौकशी अहवालानुसार ७९० प्राप्त अर्जापैकी ३१५ लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. प्रस्तावाची छाननी करणे व त्रुटी पूर्तता करुन घेणे मध्ये पंचायत समिती मधील दोन सहायक

कार्यक्रम अधिकारी यांनी विलंब केल्यामुळे त्यांची इतरत्र बदली करण्यात आलेली आहे. उर्वरित ४७५ अर्जांची छाननीची कार्यवाही सुरु आहे. निकषानुसार व प्राधान्यक्रमाने कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यात विशेष सहाय्य योजनेंतर्गत प्राप्त होणारे अनुदान मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याबाबत

**(३४) * ९४९ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना व इंदिरा गांधी वृध्दपकाळ पेन्शन योजना इ.विशेष सहाय्य योजनेंतर्गत प्राप्त होणारे अनुदान मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनांतर्गत लाभार्थ्यांना डी.बी.टी.अंतर्गत थेट बँक खात्यात अनुदानाची रक्कम जमा करण्यासाठी आधार प्रमाणीकरण, बँक तपशील, केव्हायसी बंधनकारक करण्यात आले असून जवळजवळ १० लाख लाभार्थ्यांनी याची पूर्तता न केल्यामुळे ते लाभापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकीकडे या योजनांतर्गत मिळणारे अनुदान अत्यंत तुटपुंजे असून वाढती महागाई व इतर खर्च पाहता या अनुदानाच्या रकमेत वाढ करुन ती दरमहा व नियमित मिळण्याबाबत अनेक स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी करुनही अद्याप त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) विभागाच्या दिनांक ०५ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये लाभार्थ्यांच्या दरमहा अर्थसहाय्यात रु.१०००/- वरुन रु.१५००/- इतकी वाढ करण्यात आली आहे.
संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांना डी.बी.टी. पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.
संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील डी.बी.टी. पोर्टलवर नोंदणी झालेल्या सर्व लाभार्थ्यांना माहे डिसेंबर, २०२४ चे अर्थसहाय्य डी.बी.टी. पोर्टलद्वारे थेट त्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे. माहे जानेवारी, २०२५ पासून डी.बी.टी. पोर्टलवर नोंदणीकृत आधार प्रमाणित (Aadhar Validate) झालेल्या लाभार्थ्यांनाच डी.बी.टी. पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार विशेष सहाय्य योजनांचे माहे मार्च, २०२५ पर्यंतचे अर्थसहाय्य लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे.

विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थी लाभापासून वंचित राहू नयेत यासाठी शासन स्तरावरुन सर्व जिल्हाधिकारी यांना डी.बी.टी. पोर्टलवर प्रलंबित असलेल्या लाभार्थ्यांची माहिती भरण्याची कार्यवाही युध्दपातळीवर करण्याबाबत तसेच लाभार्थ्यांचे आधार अद्ययावत / बँक खाते आधार संलग्न करण्यासाठी जिल्हा / तालुका / मंडळस्तरावर विशेष मोहिम राबवून लाभार्थ्यांचे आधार १०० टक्के अद्ययावत करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आरमोरी (जि.गडचिरोली) तालुक्यात वनपरिक्षेत्रांतर्गत बांधण्यात आलेला बंधारा तीन महिन्यांत वाहून गेल्याबाबत**

**(३५) * ४८२९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरमोरी (जि.गडचिरोली) तालुक्यात वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या इंजेवारी बिटात जिल्हा वार्षिक निधीतून पन्नास लाख रुपये खर्च करुन वांढरी नाल्यावर बांधण्यात आलेला सिमेंट बंधारा अवघ्या तीन महिन्यातच फुटून वाहून गेल्याची घटना माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उन्हाळ्यात वन्यजीवासाठी पाण्याची सोय होण्यासाठी इंजेवारी बिटात वांढरी, वैरागड, वासाडा, रामाळा यासह अनेक ठिकाणी सिमेंट बंधारे बांधण्यात आले असून वनसंरक्षक व वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या संगनमताने कंत्राटदारांनी नित्कृष्ट दर्जाचे काम करुन देयकांची रक्कम पूर्ण घेऊन शासनाची लाखो रुपयांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्याविरोधात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

आरमोरी (जि.गडचिरोली) तालुक्यातील वनपरिक्षेत्रांतर्गत इंजेवारी बिटात वांढरी नाल्यावर कक्ष क्रमांक ७८१ मध्ये बांधण्यात आलेला सिमेंट बंधारा वार्षिक योजनेच्या निधीतून बांधण्यात आलेला नसून कॅम्पा योजनेंतर्गत बांधण्यात आलेला आहे. लोकमत दैनिकात सदर सिमेंट बंधारा वाहून गेल्याबाबत प्रकाशित झालेल्या बातमीच्या अनुषंगाने दिनांक ०९.१०.२०२४ रोजी पंचासमक्ष प्रत्यक्ष मौका पाहणीत सदर सिमेंट बंधारा सुस्थितीत दिसून आला. सदर बंधाऱ्याला कुठेही भेग अथवा इजा झाल्याचे दिसून आले नाही.
(२) हे खरे नाही.

सन २०२३-२४ मध्ये कॅम्पा योजनेंतर्गत मंजूर असलेली इंजेवारी बिटात वांढरी, वैरागड, वासाडा, रामाळा येथील सिमेंट बंधारे प्रचलित नियामानुसार ई-निविदा प्रक्रीया राबवून पुर्ण करण्यात आली आहेत. सदर कामाचे योग्य मोजमाप व दर्जा तपासणी करुन वनपरिक्षेत्र अधिकारी, आरमोरी यांनी कामे अंदाजपत्रकातील मापदंडानुसार गुणवत्तापूर्वक पूर्ण झाल्याचे प्रमाणीत केले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात जात पडताळणी प्रक्रिया ऑनलाईन करण्याबाबत**

**(३६) * १६ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.विकास**

**ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.प्रविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शैक्षणिक प्रवेश, शिष्यवृत्ती, निवडणूका, नोकरी तसेच इतर लाभ मिळविण्यासाठी आवश्यक असणारे जातवैधता प्रमाणपत्रांची प्रकरणे मोठ्या प्रमाणात जात पडताळणी समित्यांकडे प्रलंबित असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही प्रमाणपत्रे अर्ज केल्यापासून १५ ते ४० दिवसात मिळणे आवश्यक असतानाही जवळजवळ ४०,००० प्रकरणे प्रलंबित असल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये ३६ जात पडताळणी समित्या स्थापित असताना यावर अध्यक्षांची नेमणूक न झाल्यामुळे तसेच मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदांमुळे केवळ ४ अध्यक्षांकडे या संपूर्ण समित्यांचा कार्यभार सोपविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मोठ्या प्रमाणावरील प्रलंबित प्रकरणांमुळे वैधता प्रमाणपत्राअभावी अनेक विद्यार्थी व नागरिक त्यांना अनुज्ञेय लाभापासून वंचित राहिले असून अनेक संघटना, संस्था, नागरिक व लोकप्रतिनिधींनी या प्रकरणी निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी करुनही ही प्रकरणे निकाली काढण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन जातवैधता प्रमाणपत्र तातडीने मिळण्यासंदर्भात तसेच स्वतंत्र पूर्णवेळ अध्यक्ष व पुरेसा कर्मचारी वर्ग देऊन जात पडताळणीचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे खरे आहे.

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडे माहे फेब्रुवारी, २०२५ अखेर एकूण ५६२०७ प्रकरणे प्रलंबित आहेत.

| अ.क्र | तपशील | प्रकरणे |
|---|---|---|
| १. | शैक्षणिक | ४९५६६ |
| २. | सेवांतर्गत | ५७९४ |
| ३. | सेवापूर्व | ३१ |
| ४. | निवडणूक | ५६१ |
| ५. | इतर | २१४ |
| ६. | जातीचा दाखल्याची अपिले | ०२ |
| ७. | तक्रार प्रकरणे | ३९ |
| | **एकूण** | **५६२०७** |

माहे डिसेंबर, २०२४ अखेर प्रलंबित असलेली प्रकरणे ४१४२३ अधिक माहे जानेवारी, २०२५ मध्ये नव्याने प्राप्त प्रकरणे ४५७१९ एकूण ८७१४२ प्रकरणे यापैकी माहे जानेवारी, २०२५ मध्ये ४०११५ प्रकरणे निकाली काढण्यात आली. तसेच माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये नव्याने प्राप्त प्रकरणे ४१४५५ व माहे जानेवारी, २०२५ अखेर प्रलंबित प्रकरणे ४७०२७ अशी एकूण ८८४८२ प्रकरणांपैकी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये ३२२७५ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजाभज, इमाव व विमाप्र (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० व त्याअंतर्गत नियम, २०१२ मधील नियम, १८ (५) नुसार जातवैधता प्रमाणपत्राचा निर्णय ३ महिन्याच्या आत घेणे बंधनकारक आहे आणि अपवादात्मक परिस्थितीत २ महिन्यांचा जास्तीचा कालावधी समितीस घेता येईल, अशी तरतूद आहे. त्यानुसार ३ महिन्यावरील ६४२३ प्रकरणे प्रलंबित आहेत.

महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेस्तरावरुन सर्व समित्यांना विशेष मोहिम राबवून विहित वेळेत वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत तसेच CET प्रवेशाबाबतची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

राज्यात जिल्हानिहाय ३६ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यान्वीत आहेत. सदर समित्यांवरील अध्यक्षांची ३० पदे ही महसूल व वन विभागामार्फत अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गातून भरण्यात येतात. उर्वरित ६ पदे ही सामाजिक न्याय विभागांतर्गत अतिरिक्त आयुक्त, समाज कल्याण तसेच मंत्रालयीन सह सचिव संवर्गातून भरण्यात येतात. सदर समित्यांवरील अध्यक्ष या पदावर कार्यरत असलेल्या १४ अध्यक्षांपैकी १० अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) यांची भारतीय प्रशासन सेवेतील पदावर निवड झाल्याने अध्यक्षांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त झाल्याने कार्यरत असलेल्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या अन्य अध्यक्षांकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला होता. तथापि, महसूल व वन विभागाने दिनांक २५.०२.२०२५ च्या शासन निर्णयान्वये २९ अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गातील अधिकाऱ्यांची समित्यांवरील रिक्त असलेल्या अध्यक्ष पदावर पदस्थापना केली आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत १६ अधिकारी रुजू झाले आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून अध्यक्षांची ३ पदे प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी इच्छुकता मागविली आहे. याशिवाय समितीवरील अन्य रिक्त असलेली पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

महासंचालक, बार्टी, पुणे यांचेस्तरावर सर्व समित्यांचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. सदर आढावा बैठकीमध्ये समित्यांना विशेष मोहिम राबविणे, विद्यार्थ्यांचे त्रुटीयुक्त प्रकरणांबाबत वेबीनारचे आयोजन करणे, विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन करणे, जिल्ह्यातील स्थानिक वर्तमानपत्रामध्ये विनामूल्य प्रेसनोट देऊन प्रचार व प्रसार करणे तसेच इतर माध्यमातून जात प्रमाणपत्र पडताळणीच्या विशेष मोहिम राबविण्यात येऊन सर्व प्रलंबित प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्याबाबत सर्व समित्यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृषी विभागाने कृषी साहित्य खरेदीत केलेला गैरव्यवहार

**(३७) * २०४२ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी साहित्य खरेदीसाठी यापूर्वी सुरु असलेली थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) योजना बंद करुन शासनाने स्वत: कृषि साहित्य खरेदी करण्याचा निर्णय घेतला असून नियोजन विभागाच्या शासन निर्णयाला डावलून

विविध कृषि साहित्याची बाजारभावापेक्षा दुप्पट दराने खरेदी केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बॅटरीवर चालणारे स्प्रे पंप, कापूस साठवणूक बॅग, नॅनो युरिया, मेटाल्डीहाईड (कीटकनाशक) इत्यादी अनेक कृषि साहित्याची खरेदी बाजारमुल्यापेक्षा दुप्पट चढ्या दराने करुन शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान करण्यासह लाभार्थी संख्या कमी दाखवून यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भारतीय किसान संघ विदर्भ प्रांत, नागपूर तसेच विविध संघटना, नागरिक व लोकप्रतिनिधींनी या प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबतचे निवेदन तत्कालीन मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री महोदयांकडे दिले असता यासंदर्भात चौकशी समिती नेमण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

कापूस सोयाबीन पिकांची उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२३-२४ साठी नॅनो युरिया, नॅनो डिएपी, मेटाल्डीहाईड, बॅटरी संचलित फवारणी पंप व कापूस साठवणूक बॅग या निविष्ठा शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यासाठी या निविष्ठांचे दर हे महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांच्या स्तरावर विहित निविदा प्रक्रिया राबवून निश्चित करण्यात आले होते. तसेच, कापूस साठवणूक बॅगबाबत महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांच्या स्तरावरुन दर निश्चित करण्यात आलेले आहेत. उपलब्ध निधी व या यंत्रणांनी निश्चित केलेले दर विचारात घेऊन लाभार्थी संख्या निश्चित करण्यात आली आहे.
(३) होय.

याबाबत श्री.नाना आखरे, भारतीय किसान संघ व इतर विविध संघटना यांनी केलेल्या तक्रारीच्या प्रती आयुक्त कार्यालयास पाठवून अभिप्राय प्राप्त करुन घेण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी मानसिक व शारीरिक त्रास होत असल्याबाबत

**(३८) * ३०१४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी नागरी सुविधा केंद्रावर सुरु केलेल्या Agri stack मध्ये येणाऱ्या अडचणींमुळे शेतकऱ्यांना मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, Agri stack प्रकल्पामुळे प्रधानमंत्री किसान योजना, शेतकरी कर्ज वितरण सुलभता, पिक विमा योजना, पिक हमीभाव खरेदीसाठी मदत, किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत कर्ज वितरण, थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) तसेच या प्रकल्पामुळे केंद्र व राज्य शासनाच्या कृषी बाबतच्या सर्व योजनांची माहिती उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यात कृषी विभागात १०० टक्के कामाची पद्धत ही संगणकीकृत झाली असून कृषी सहाय्यक संघटनेने ऑनलाईन कामासाठी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे बहिष्कार टाकला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ऑनलाईन नोंदणीसाठी शेतकऱ्यांना नागरी सुविधा केंद्रावर जावे लागते, परंतु, तेथील सर्व्हर डाऊन होऊन संथगतीने सुरु असल्यामुळे शेतीची कामे सोडून तासनतास केंद्रावर उभे रहावे लागत असल्याने बहुतांशी शेतकरी वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकल्प राबविताना शेतकऱ्यांना प्रकल्पात सामावून घेण्याबाबत तसेच कृषी सहाय्यकांना ऑनलाईन कामकाजासाठी उपलब्ध साधने व शेतकऱ्यांना शासकीय योजनाचा लाभ तात्काळ मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.
(२) ॲग्रीस्टॅक योजनेमुळे लाभार्थ्यांची योग्य आणि पारदर्शक निवड करणे तसेच योजनांचा लाभ घेण्याबाबतची द्विरुक्ती टाळणे या बाबी शक्य होणार आहेत.
(३), (४) व (५) कृषि विभागातील बहुतांश योजना १००% संगणकीकृत करण्याची कार्यवाही सुरु आहे. कृषी सहायकांना या योजनांचे संगणकीकृत कामकाज सुलभरित्या होण्यासाठी प्रतिमाह रुपये ५००/- याप्रमाणे डेटा चार्जेस देण्यात येत आहेत. महाराष्ट्र राज्य कृषि सहाय्यक संघटनेचा ॲग्रीस्टॅक या योजनेच्या कामासाठी काही कालावधीकरीता असलेला असहकार मागे घेण्यात आला आहे व सद्यःस्थितीत काम प्रगतीपथावर आहे.
ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत शेतकरी माहिती संच मध्ये अधिकाधिक शेतकऱ्यांची नोंदणी होण्यासाठी शेतकरी संच निर्मिती, मोहिम स्वरुपात करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विटा (जि. सांगली) येथील निवासी शाळांमध्ये २४ विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याबाबत

**(३९) * ४९६४ श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विटा (जि.सांगली) येथील शासकीय निवासी शाळेमधील १० ते १५ वयोगटातील इयत्ता ६ वी ते १० वी च्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या २४ विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) होय.
विटा, जि.सांगली येथील शासकीय निवासी शाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना दिनांक १९ जानेवारी, २०२५ रोजी नाष्ट्यामध्ये पोहे, अंडी व दुपारच्या जेवणामध्ये मटण, चपाती, भात, सलाड, कांदा, लिंबु असा आहार देण्यात आला होता. तसेच संध्याकाळी कलिंगड व दुध व रात्रीच्या जेवणात डाळ व भात असा आहार देण्यात आला

होता. दुसऱ्या दिवशी दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता शाळेतील २९ विद्यार्थ्यांना उलट्या, जुलाब व पोटदुखीचा त्रास होत असल्याने उपचारार्थ शासकीय रूग्णालय, विटा, जि.सांगली येथे दाखल करण्यात आले होते. वैद्यकीय अधिकारी, विटा, जि. सांगली यांनी विद्यार्थांना देण्यात आलेले अन्न, फळे, दूध किंवा पाणी यामुळे अन्नातून विषबाधा झाल्याबाबत कळविले आहे. तसेच दूषित अन्न किंवा दूषित पाण्यामुळे विद्यार्थ्यांना उलट्या, जुलाब व पोटदुखी झाल्याची शक्यता वर्तविली आहे.
(२) अनुसुचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, विटा या शाळेला भोजन पुरवठा करणाऱ्या भोजन पुरवठादाराच्या जानेवारी, २०२५ च्या भोजन देयकामधुन रु.५०,००० इतका दंड आकारण्यात येत असुन सदर शाळेत भोजन पुरवठा करणारा व्यवस्थापक बदलण्यात आला आहे. तसेच संबधित निवासी शाळेचे मुख्याध्यापक व गृहपाल यांनी पदावर असताना कर्तव्यात कसुर केल्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील क्रशरखाण व्यवसायामुळे घरांना तडे जाऊन नुकसान होत असल्याबाबत**

**(४०) * १७६७ श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील हातीप, विसापूर, शिरखळ व चिंचाळी ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात क्रशर तसेच खाण व्यवसायामुळे संपूर्ण गावे उध्वस्त होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त खाणीतील उत्खनन, भूसुरुंग स्फोट इत्यादीमुळे विसापूर, हातीप, ओळवण, दगडवणे, पालघर, सोंडेघर या गावातील अनेक घरांना तडे जाऊन ती कधीही कोसळण्याची स्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त खाणीत क्षमतेपेक्षा जास्त भूसुरुंग स्फोट घडवून आणले जात असतानाही प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच गावासह संपूर्ण पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) मौजे हातीप व विसापूर गावातील कोणत्याही घरांना तडे गेल्याचे आढळून आले नाही. मौजे शिरखळ व चिंचाळी गावातील काही घरांच्या भिंतीला चिरा व भेगा पडल्याचे तर मौजे शिरखळ ओळणवाडी येथील एका गोठ्यास चिरा व भेगा पडल्याचे आढळून आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उपप्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर यांनी केलेल्या तपासात ६ स्टोन क्रशरबाबत आढळून आलेल्या त्रुटी व संमती पत्रातील अटी व शर्तीची पूर्तता न केल्यामुळे स्टोन क्रशर यांच्यावर कारवाई करण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला आहे.
(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथील मागासवर्गीय संस्थाना उद्योग-व्यवसाय उभारणीसाठी दिलेल्या अनुदानाचा गैरवापर केल्याबाबत

**(४१) * ५९६९ श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथील ७५ मागासवर्गीय संस्थाना उद्योग-व्यवसाय उभारणीसाठी शासनाने दिलेल्या अनुदानांचा गैरवापर करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय लेखापरीक्षणामध्ये ९ संस्थांनी सुमारे १९ कोटी ९६ लाखांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सर्व संस्थांच्या संचालक मंडळावर शासन अनुदानाच्या वसुलीसाठी हातकणंगले, पेठवडगाव, शहापूर आणि इचलकरंजी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गुन्हे दाखल होऊनही अद्याप या प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधित संचालक मंडळांवर कारवाई करण्यासह शासन अनुदानाची वसूली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४), (५) व (६) लोकलेखा समितीच्या निदेशानुसार हातकणंगले तालुक्यातील ३२ संस्थांची महसूली वसूली सुरु आहे. तसेच, सहकार विभागामार्फत गुन्हे दाखल झालेल्या १५ संस्थांबाबत निर्णय न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## सांगली जिल्ह्यात पिक संजीवक औषधांच्या (पीजीआर) कंपनीत बनावट औषधांची निर्मिती व पुरवठा करून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(४२) * ९२६ श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने पिक संजीवक औषधांच्या (पीजीआर) कंपनीत बनावट औषंधाची निर्मिती व पुरवठा करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी आयुक्तालयाने नवीन पिक संजीवक औषधांच्या कंपनीची नोंदणी बंद करुनही अनेक नवीन कंपन्या नोंदणी न करता बनावट कंपन्यांकडून औषधांची निर्मिती केली जाणे, बनावट औषधांचा पुरवठा कृषी केंद्रामार्फत उत्पादकांना करणे या कारणांमुळे अंदाजे वार्षिक ८०० कोटीं रुपयांची उलाढाल होत असून बनावट कंपन्यांकडून औषध विक्री जास्त दराने होत असल्यामुळे शासनाचा महसूल बुडत असून शेतकऱ्यांचेदेखील नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या ८ प्रयोगशाळा चार वर्षांपासून बंद असून याबाबतचा तपासणी अहवाल प्राप्त होत नसल्यामुळे उत्पादनाची तपासणी करण्याबाबतची तक्रार कृषी विभागाकडे केली असता, ती कंपनी बंद असल्याचे सांगून बनावट कंपनीमार्फत गैरव्यवहार सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कृषी विभागाकडून व कंपन्यांकडून सल्लागाराची नेमणूक होत असून औषधांच्या एमआरपीवर कंपनीकडून त्यांना १५-२० टक्के एवढे कमिशन देऊन सदरहू सल्लागार हे बनावट व महागड्या औषधांचा वापर पिकांवर करावयाचा सल्ला शेतकऱ्यांना देत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाकडे जी-२ प्रमाणपत्रावर पिक संजीवकांची विक्री करणाऱ्या १३३५ कंपन्यांची नोंद असून सन २०२१ मध्ये कीटकनाशक औषधांप्रमाणे पिक संजीवक औषधांनाही नियमावली तयार करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाला सादर केला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधित कृषी अधिकारी, बनावट कंपन्या व त्यांचे मालक, कृषी सेवा केंद्र वितरक तसेच सल्लागार यांच्याविरुद्ध कारवाई तसेच बनावट औषधांचा साठा जप्त करुन नष्ट करण्याबाबत त्याचप्रमाणे नियमावलीसंदर्भात केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) सांगली जिल्ह्यात कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने पिक संजीवक औषधांच्या (पीजीआर) कंपनीत बनावट औषधांची निर्मिती व पुरवठा करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याच्या बातम्या दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या त्यानुसार कृषी आयुक्तालयाने शहानिशा केली असता असे निदर्शनास आले नाही.
(२) असे निदर्शनास आलेले नाही.
(३) राज्यामध्ये एकूण पाच खत चाचणी प्रयोगशाळा असून जैवउत्तेजक तपासणीची विश्लेषण पद्धती केंद्र शासनाकडून प्राप्त झाली नसल्यामुळे त्यामध्ये जैवउत्तेजक चाचणी होत नाही. बनावट कंपनीमार्फत गैरव्यवहार सुरु असल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(४) असे निदर्शनास आलेले नाही.
(५) केंद्र शासनाचे स्थायी आदेशानुसार राज्यामध्ये १३३५ कंपन्यांना जैवउत्तेजक प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले आहेत. परंतु, कीटकनाशक औषधांप्रमाणे पिक संजीवक औषधांनाही नियमावली तयार करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाला सादर केलेला नाही.
(६) दिनांक १२ सप्टेंबर, २०२४ रोजी केंद्र शासनाने खत नियंत्रण आदेश १९८५ मधील शेड्यूल्ड ६ मध्ये ४ वर्गामध्ये ११ जैवउत्तेजके ग्रेड निश्चीत करुन देण्यात आले आहेत. परंतु, सदर ग्रेडच्या विश्लेषणाची पद्धती निश्चीत करुन दिलेली नसल्यामुळे सद्य:स्थितीत जैवउत्ततेजक उत्पादनावर, गुणनियंत्रणावर व विक्री परवाना निर्गमित करण्यावर मर्यादा येत आहेत. त्यानुषंगाने केंद्र शासनाकडे कृषी आयुक्तालयाने याबाबतचे मार्गदर्शन मागविलेले आहे.

-----------------

## वसई-विरार येथील समुद्र व खाडी किनाऱ्यावर संरक्षणाकरिता असलेल्या कांदळवन भागात अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर कारवाई होण्याबाबत

**(४३) * ३८४२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील वसई-विरार समुद्र व खाडी किनाऱ्यावरील पाण्याचा प्रवाह रोखणे, जमिनीची धूप थांबविणे, त्सुनामी, चक्रिवादळ व पुरापासून संरक्षण करण्याकरिता आवश्यक असलेल्या कांदळवन क्षेत्रात नायगांव, ससूनवघर, जुचंद्र, शिरगांव व नारंगी इ. विविध ठिकाणी कांदळवनाची कत्तल करुन मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजतागायत या परिसरातील सुमारे १४९ हेक्टर इतके कांदळवन क्षेत्र नष्ट झाले असून या प्रकरणी गेल्या वर्षभरात १३ गुन्हे व १० तक्रारी दाखल असून त्यांची चौकशी सुरु असल्याचे महसूल विभागाने स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी नायगांव पोलीस ठाण्यात सन २०२३ मध्ये ६ गुन्हे दाखल असतानाही संबंधित दोषी भूमाफियांविरुद्ध पोलीसांनी कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन कांदळवनाची कत्तल रोखण्यासह यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) मौजे जुचंद्र येथील स.क्र.२०९ व २४७ या शासकीय जमिनीवरील कांदळवनाचे नुकसान करुन अतिक्रमण करुन अनधिकृतपणे बांधलेल्या सुमारे १३५ एवढ्या खोल्या व गाळयांची बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.

वसई तालुका क्षेत्रातील मौजे ससुपाडा, ससूनवघर, मालजीपाडा, जुचंद्र येथे कांदळवनाची कत्तल करुन झालेल्या माती भरावाबाबत कसुरदार व्यक्तींविरोधात सन २०२३ पासून आजपर्यंत नायगांव पोलिस ठाणे, मिरा भाईंदर (वसई-विरार पोलिस आयुक्तालय अंतर्गत) येथे ११ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच जिल्हाधिकारी, पालघर कार्यालयाकडे १९ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ मधील तरतुदीनुसार संबंधितांना लेखी म्हणणे सादर करण्यासाठी जिल्हाधिकारी, पालघर कार्यालयाकडून नोटीसा पाठविण्यात आलेल्या आहेत. कांदळवन संरक्षण व संवर्धन करण्याच्या दृष्टीने उपाययोजना म्हणून उप विभागीय अधिकारी कार्यालयाच्या हद्दीमध्ये कांदळवनाचे क्षेत्र असलेल्या भागातील क्षेत्रीय अधिकारी यांच्यामार्फत वेळोवेळी कांदळवन क्षेत्राची पाहणी करण्यासाठी तलाठी व मंडल अधिकारी यांची पथके तयार करण्यात आलेली आहे. त्यांच्यामार्फत कांदळवनाचे नुकसान करणाऱ्यांविरुद्ध फौजदारी कारवाई केली जाते.

नायगाव पोलीस ठाणे येथे दाखल झालेल्या ११ गुन्ह्यांपैकी १० गुन्हे न्यायप्रविष्ठ असून, एका गुन्ह्याचा तपास पोलिसांमार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कुशल कामांच्या निधी वितरणामध्ये अनियमितता केल्याबाबत

**(४४) * १८९८ श्री.संदिप क्षीरसागर (बीड), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चनई (ता.आंबेजोगाई, जि.बीड) व पंचायत समिती, बीड तसेच यवतमाळ जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत केलेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची असून त्यात कंत्राटदार व अधिकारी यांचे संगनमताने मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंचायत समिती, बीडने कुशल कामांची मागणी रितसर व नियमानुसार न करता सदर कामांची देयके नियमबाह्यरित्या ग्रामपंचायतीला वर्ग केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील जास्तीचा आहरीत केलेला कुशल निधी बीड पंचायत समितीने ग्रामपंचायतीला दिल्यानंतर काही ग्रामपंचायीचा जास्तीचा आहरीत कुशल निधी पंचायत समिती, बीडने परत घेतलेला आहे व काही ग्रामपंचायतींना यामधून बेकायदेशीररित्या सूट देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेंतर्गत झालेल्या निकृष्ट कामांची तसेच गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे करुनही त्यासंदर्भात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन अपहारीत रकमेची वसूली करण्यासह दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
जादा आहरित निधी रु.९९९.२० लक्षपैकी ७१८.५९ लक्ष इतका निधी परत केलेला आहे.
(४) हे अशंत: खरे आहे.
तक्रारी संबंधात चौकशी करण्यात येत आहे.
(५) कुशल निधी वितरण प्रकरणी जास्तीचा निधी आहरित केल्याने तत्कालीन गटविकास अधिकारी पंचायत समिती, बीड यांचेवर शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित केला असून ग्रा.पं चनई ता.अंबाजोगाई, जि.बीड येथील मनरेगा अंतर्गत झालेल्या कामांच्या तपासणी प्रकरणी चौकशीसाठी जिल्हास्तरावरुन कार्यकारी अभियंता, जि.प. बीड यांचे अधिनस्त चौकशी समिती नेमण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अनेक जिल्ह्यात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघातग्रस्त व मृत पावलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना विमा निधी व अनुदानाची रक्कम मिळण्याबाबत

**(४५) * ४९३२ श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक जिल्ह्यात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत लाखो लाभार्थी अनुदानापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत प्रलंबित दाव्यांमध्ये हेतूपुरस्सर त्रुटी काढून शेतकऱ्यांचे दावे प्रलंबित ठेवण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपघाग्रस्त व मृत पावलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना तात्काळ विमा निधी तसेच सदरहू प्रलंबित प्रस्ताव व अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांना मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

(३) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेंतर्गत सन २०२४-२५ या वर्षात राज्यात ७६४० इतके प्रस्ताव प्राप्त झाले असून, त्यापैकी ५११२ इतके प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहे.

तसेच, ५८७ प्रस्ताव नामंजूर करण्यात आले असून, १४५७ इतके प्रस्ताव कागदपत्रांअभावी प्रलंबित आहेत. उर्वरित ४८४ विमा दावे कार्यवाहीच्या प्रक्रियेत आहेत. सन २०२४-२५ मध्ये गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेकरिता रु.१२०.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत असून, यापैकी रु.११६.०० कोटी इतके अनुदान पात्र लाभार्थ्यांना वितरित करण्यासाठी कृषि आयुक्तालयास उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्यानुसार वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या मत्स्यव्यवसाय सोसायट्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(४६) * ३७३६ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यामध्ये माहे जुलै, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे मासेमारी संस्थांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसान भरपाई म्हणून मत्स्यव्यवसाय विभागाकडे रु.७२६.६४ लक्ष रुपये निधी वितरित करण्यात आला असून उक्त निधी वितरित करताना ६० से.मी. पाणी वाहून गेल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक होते, तथापि, अतिवृष्टीत तलावातील ६० से.मी. पाणी वाहून गेले नसताना देखील तलावामध्ये असलेले मत्स्यबीज पूर्णपणे वाहून गेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अट शिथील करुन सर्वच मत्स्यव्यवसाय सोसायट्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (बल्लारपूर) यांनी लेखी निवेदनाद्वारे मा.मत्स्यव्यवसाय मंत्री महोदयांनी दिनांक १ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) व (२) चंद्रपूर जिल्ह्यामध्ये माहे जुलै, २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे स्थानिक मच्छिमार सहकारी संस्थांच्या झालेल्या नुकसानीबाबत, तत्कालीन मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांनी वाहून गेलेल्या मत्स्यबीजासाठी नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार जिल्हा खनिज प्रतिष्ठान जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांच्याकडून रु.७२६.६४ लक्ष निधी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, चंद्रपूर यांना संबंधीत मच्छिमार सहकारी संस्थांना वितरित करण्यास्तव मान्यता देण्यात आली आहे.

शासन निर्णय दिनांक ०३/०७/२०१९ मधील तरतुदीनुसार तलावाच्या / जलाशयाच्या साडव्यावरुन / भिंतीवरुन सलग १२ तासांकरिता ६० से.मी. पाणी वाहिल्यास असा तलाव/जलाशय मत्स्यव्यवसायाच्या दृष्टीकोनातून अतिवृष्टीग्रस्त असेल. या तरतुदीनुसार प्राप्त प्रमाणपत्रानुसार नुकसान भरपाईची तरतूद वितरित करण्यात येत आहे.

(३) व (४) ६० से.मी. पाणी वाहून गेल्याचे पाणी प्रमाणपत्र देण्याची अट शिथील करुन सर्वच मत्स्यव्यवसाय संस्थाना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (बल्लारपूर) यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनानुसार आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाकडून प्राप्त प्रस्तावाची तपासणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गेटवे ऑफ इंडियावरुन एलिफंटाला तसेच घारापुरी व मांडव्याला जाणाऱ्या प्रवासी बोटीच्या विनापरवाना वाहतुकीबाबत

**(४७) * ५४८३ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गेटवे ऑफ इंडियावरुन एलिफंटाला जाणाऱ्या फेरीबोटीला अपघात झाल्याने पुरेशा सुरक्षेअभावी जवळपास १५ प्रवासी दगावले असून प्रशासनाने फेरीबोटी व वॉटर टॅक्सीमध्ये लाईफ जॅकेट वापरणे सक्तीचे केले असून उक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी गेटवेवर अधिकारी तैनात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जेट्टी नंबर ५ ही मुंबई पोर्ट ट्रस्टच्या मालकीची असून प्रवासी आणि पर्यटकाच्या वाहतुकीसाठी वापरली जात असून येथे खाजगी बोटींची संख्या मोठ्या प्रमाणात असून तिकीटांचे दरही निश्चित नसून तेथे प्रवासी आणण्यासाठी एजंटला स्पीडबोट चालकाकडून कमीशन दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जेट्टीवरुन हार्बर क्षेत्रात विनापरवाना प्रवासी वाहतूक सुरु असून अशा बोटीमध्ये लाईफ जॅकेट वा सुरक्षेचे इतर कोणतेच साधन नसून त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच घारापुरी आणि मांडव्याला जाणाऱ्या हायस्पीड वॉटर टॅक्सीसाठी शासकीय शुल्क कमी असूनही चालकाकडून अधिकारी १० हजार रुपयांची बेकायदा वसूली करत असून त्यास विरोध केल्यास कठोर नियमांची अंमलबजावणी करीत चालकांना वेठीस धरण्यात येत असल्याचे आरोप टॅक्सी चालकांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणांची चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) होय,

महाराष्ट्र सागरी मंडळ स्तरावरुन परिपत्रकाद्वारे प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या अनुषंगाने सर्व बोट ऑपरेटर यांना सक्त सूचना दिलेल्या आहेत.

गेटवे ऑफ इंडिया ते एलिफंटा प्रवासी वाहतूकीचे नियंत्रण व नियमन महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत करण्यात येते. गेटवे ऑफ इंडिया येथील क्र.१ ते ४ जेट्टीवर महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे जवान तैनात करण्यात आलेले असून त्यांच्याकडून प्रवासी बोटीत प्रवासी क्षमतेइतकी वाहतूक होत असल्याची खात्री केली जात आहे. तसेच बोटीत बसण्याआधी प्रत्येक प्रवाशाला लाईफ जॅकेट परिधान करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

(२) व (३) गेटवे ऑफ इंडिया हे मुंबई बंदर प्राधिकरण यांच्या अखत्यारित येते. गेटवे ऑफ इंडिया येथून मांडवा व घारापुरी येथे जाणाऱ्या प्रवासी बोटींचे तिकीट दर हे मुंबई बंदर प्राधिकरण यांच्या कडून निश्चित केले जातात.

गेटवे ऑफ इंडिया येथील हार्बर क्षेत्रात वाहतूक करण्यासाठी मुंबई बंदर प्राधिकरण यांचेकडून हार्बर लायसन्स देण्यात येते.

उपरोक्त बाबींच्या कार्यवाहीबाबत मुंबई बंदर प्राधिकरण यांना महाराष्ट्र सागरी मंडळाच्या स्तरावरुन कळविण्यात आले आहे.

(४) नाही.

तथापि, गेटवे ऑफ इंडिया येथील पाच नंबर जेट्टीवरील वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने मांडवा ते गेटवे ऑफ इंडिया दरम्यान स्पीड बोट चालविण्यासाठी इच्छुक मालकांनी महाराष्ट्र सागरी मंडळाकडे सादर केलेल्या ४९ प्रस्तावांना, मांडवा ते गेटवे ऑफ इंडिया, बेलापूर आणि एलिफंटा या जलमार्गासाठी तात्पुरत्या स्वरुपात Pilot Basis वर दिनांक २५.०५.२०२५ पर्यन्त प्रति महिना प्रति स्पीडबोटीसाठी रक्कम रु.४९९९/- जीएसटी सहित किंवा माहे डिसेंबर, २०२४ ते मे, २०२५ या कालावधीकरीता रक्कम रु.३०,०००/- जीएसटी सहित इतके मांडवा जेट्टीकडून परवानगीकरीताचे प्रवासी शुल्क महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार जलमार्गासाठी परवानगी (Route Permission) देण्यात आलेली आहे. सदर ४९ स्पीड बोटींकडून रु.६,५९,९२२/- (जीएसटीसहित) इतकी महसूल शुल्क स्पीड बोट मालकाकडून प्रादेशिक बंदर अधिकारी, मोरा यांचेकडे भरणा केलेले आहे.

तसेच जेट्टी क्र.५ चा वापर करणाऱ्या बोटींमधून वाहतूक करणाऱ्या प्रत्येक प्रवाशाचे प्रत्येक वेळी (one time/single use) करीता रक्कम रु.७७/-, सिझन पास रु.१०,७२८/- आणि हाफ सिझन पास ५,७१०/- इतके निश्चित करण्यात आले आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण-पनवेल (जि.रायगड) येथील विविध प्रकल्प उभारताना सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करुन अनधिकृत भराव केल्याबाबत

**(४८) * ४८६२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण-पनवेल (जि.रायगड) परिसरातील जेएनपीए बंदर, जेएनपीए सेज, सिडको-रिलायन्सचा सेज यासह विविध प्रकल्प उभारण्यात आली असून हे प्रकल्प उभारण्यासाठी हजारो हेक्टर खाजण, कांदळवन आणि नैसर्गिक सखल क्षेत्रात सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करुन मोठ्या प्रमाणात विनापरवानगी व बेकायदेशीररित्या माती-दगडांचा भराव टाकण्यात येत असल्याचे तसेच बेकायदेशीरित्या उत्खनन होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीररित्या केलेल्या भराव तसेच उत्खननापोटी कोणतीही रॉयल्टी शासनाला भरलेली नसून यात कंत्राटदार व विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने अब्जावधी रुपयांचा महसूल बुडवून शासनाचे नुकसान केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उरण-पनवेल परिसरात विविध प्रकल्प उभारण्यासाठी हजारो ब्रास माती, दगडांचा भराव करताना तो भराव कोठून उपलब्ध करण्यात आला तसेच त्याची शासनास किती रॉयल्टी भरली याबाबत शासनाकडे कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन बेकायदेशीर भराव व उत्खनन रोखणे व रॉयल्टी वसूल करण्यासह यातील दोषी प्रकल्पधारक, कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) उरण-पनवेल (जि.रायगड) परिसरामध्ये जेएनपीटी क्षेत्रामधील विकास संदर्भातील कामे, पर्यावरणीय प्रभाव मुल्यांकन अधिसूचना २००६ व कोस्टल झोन मॅनेजमेंट अधिसूचना २०११ व २०१९ च्या पर्यावरण मान्यतेने करण्यात आलेली आहे. तसचे सिडकोमार्फत द्रोणगिरी नोड येथे एकूण

१४९५ हेक्टर क्षेत्र विकसित करण्यात येत असून त्याकरीता आवश्यक परवानगी व कोस्टल झोन मॅनेजमेंट कायद्याचे पालन करुन विकास कामे करण्यात येत आहे.

वन विभागाच्या उरण-पनवेल यांचे ताब्यात असलेल्या कांदळवन क्षेत्रात भराव अथवा उत्खनन करण्यात आले असल्याबाबत निदर्शनास आलेले नाही. मात्र मौजे वालटीखार, ता.उरण येथली स.नं.१७ व १९ मध्ये पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ चे कलम १५ व १९ अन्वये व मौजे केगाव, ता.उरण येथील स.नं.२३८ वरील भरावाबाबत भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ३३ (१) सी व ६५ (A) अन्वये कांदळवन क्षेत्रामध्ये अनधिकृत भराव केल्याबाबत गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

जेएनपीए कार्यक्षेत्रांतर्गत प्रकल्पामधील उरण-पनवेल परिसरातील जेएनपीए प्रकल्पाग्रस्तांना १२.५% योजनाअंतर्गत भुखंडाचे वाटप करण्यासाठी दास्तान फाटा, गाव जासई द्रोणागिरी नवी मुंबई जवळ १११ हेक्टर क्षेत्राचा एकात्मिक विकास कामासंदर्भात भरावाचे काम, रस्त्यांचे रुंदीकरण करणे व जेएनपीएच्या चौथ्या कंटेनर टर्मिनलचे कामाकरीता ३०,७०,६५७.८३ ब्रास परिमाणापोटी रक्कम रु.१८२,११,८२,९६०.६४/- इतके स्वामित्वधन शासन जमा केले आहे.

तहसिलदार, पनवेल व उरण यांचे कार्यक्षेत्रामध्ये सन २०२४-२५ या अर्थिक वर्षांमध्ये गौण खनिजाच्या अवैध वाहतूक प्रकरणी २७ वाहनांवर कारवाई करण्यात येवून रु.५०,८७,०३५/- एवढा दंड वसूल करण्यात आलेला आहे. अनधिकृत उत्खनन व वाहतूकीबाबत तालुका स्तरावर पथके स्थापन करुन कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना वेळोवेळी देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील काही जिल्ह्यात तर मुंबई परिसरात अवैध वृक्षतोडीवर आळा घालण्याबाबत

**(४९) * १३०८ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वृक्ष तोड होत असून गोरेगाव (मुंबई) येथील आरे कॉलनी परिसरात विकासाच्या नावाखाली राजरोसपणे वृक्षांची कत्तल करण्याचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध वृक्षतोड करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी स्थानिक नागरिक व पर्यावरण प्रेमींनी शासनाकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैध वृक्षतोड थांबविण्यासाठी पोलिस विभागाच्या धर्तीवर वनविभागात गुप्त सेवा निधी उभारण्याची आवश्यकता असून याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या निर्णयार्थ प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील अवैध वृक्षतोड थांबविणे तसेच यासाठी गुप्त सेवा निधी उभारण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) व (२) गोरेगाव (मुंबई) येथील आरे दुग्ध वसाहतीतील दुग्धव्यवसाय विकास विभाग तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांच्या अधिपत्याखालील शासकीय जागेत विकासाच्या नावाखाली बेकायदेशीररित्या वृक्षतोड झाली असल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) गुप्त सेवा निधीची अधिसूचना वित्त विभाग महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.५ दिनांक २२.०१.२०१३ नुसार पोलीस विभागाच्या धर्तीवर वन विभागात गुप्त सेवा निधी वापरण्यात येत आहे.

अवैध वृक्षतोड थांबविण्याकरिता वन विभागाकडून वेळोवेळी उपाययोजना करण्यात येत आहेत.

• वनक्षेत्रात वेळोवेळी गस्त घालणे.

• वन संरक्षण समित्यांचा वन संरक्षणाकरिता सक्रीय सहभाग घेण्यात येतो.

• वनगुन्ह्यांची माहिती देण्याकरिता हॅलो फॉरेस्ट १९२६ हा टोल फ्री क्रमांक कार्यान्वित केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.